महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

मूल्य २/- रुपये

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

• संपादक: राकेश शंकर गोरे | वर्ष: १५, अंक: १०, पृष्ठ: ८ | मुंबई, मंगळवार ४ जून २०२४ ते सोमवार १० जून २०२४ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

# उद्धव ठाकरें 'त्या' पत्रकार परिषदेमुळे अडचणीत; केंद्रीय निवडणूक आयोगाने दिले कारवाईचे आदेश



■ मुंबई: (विशाल कारंडे) लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जून रोजी लागणार आहे. या निकालाकडे संपूर्ण देशाचं लक्ष लागलं आहे. मात्र, या निकालाच्या एक दिवस आधी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना मोठा धक्का बसला आहे. लोकसभा निवडणुकीच्या मुंबईतील मतदानाच्या दिवशी उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत निवडणूक आयोग आणि भाजपावर गंभीर आरोप केले होते. उद्धव ठाकरे यांच्या या पत्रकार परिषदेवर भाजपाने आक्षेप घेतला होता. त्यानंतर भाजपा नेते आशिष शेलार यांनी यासंदर्भात निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली होती.

आशिष शेलार यांच्या तक्रारीनंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने उद्धव ठाकरे यांच्या पत्रकार परिषदेसंदर्भातील माहिती राज्य निवडणूक आयोगाकडून मागवली होती. यानंतर आता उद्धव ठाकरे यांच्यावर योग्य ती कारवाई करा, असे आदेश केंद्रीय निवडणूक आयोगाने दिले असल्याची माहिती समोर आली आहे. आशिष शेलार यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे उद्धव ठाकरे यांच्या पत्रकार परिषदेबाबत तक्रार करताना आचारसंहितेचा भंग केल्याचा आरोप करत तक्रार दाखल केली होती. दरम्यान, आता उद्धव ठाकरे यांना मतदानाच्या दिवशी घेतलेली ती पत्रकार परिषद भोवण्याची चिन्ह आहेत. राज्यातील पाचव्या टप्प्यातील मतदान पार पडत असताना मुंबईत मतदान सुरु असताना उद्धव ठाकरे यांनी एक पत्रकार परिषद घेतली होती. त्यामध्ये ज्या भागात शिवसेना ठाकरे गटाचे मतदान जास्त आहे, त्या ठिकाणी मतदानाची प्रक्रिया अतिशय संथ गतीने पार पडत आहे, असा गंभीर आरोप उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केला होता.

(शेष पृष्ठ २ वर)

## संक्षिप्त

### मनोज जरांगेंच्या आंदोलनाला गावातूनच विरोध, उपसरपंचासह ७० ग्रामस्थांची जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव

■ मुंबई: सम्यक कासारे

लोकसभा निवडणुकी नंतर मनोज जरांगे पाटील मराठा आरक्षणासाठी अंतरवाली सराटी या त्यांच्या गावात ४ जून रोजी उपोषणाला बसणार आहेत. दरम्यान मनोज जरांगे पाटील यांच्यासाठी त्यांच्याच गावातून



धक्कादायक बातमी आली आहे. अंतरवाली सराटी परिसरातील सामाजिक सलोखा बिघडत असल्याचे म्हणत तेथील ग्रामस्थांनी जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला विरोध केला आहे. यासाठी ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेत निवेदन दिले आहे. या निवेदनाद्वारे मनोज जरांगे पाटील यांना अंतरवाली सराटीमध्ये उपोषणास परवानगी देऊ नये अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर उपसरपंच, पाच ग्रामपंचायत सदस्य आणि ७० ग्रमास्थांच्या सह्या आहेत. जरांगे यांच्या आंदोलनाच्या विरोधात गेल्या तीन ते चार दिवसांपासून गावात सह्यांची मोहीम सुरू होती.

### निवडणुका आता उन्हाळयात होणार नाहीत, निवडणूक आयुक्तांचा मोठा निर्णय

■ मुंबई: रघुवीर जाधव

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत सर्वच निवडणूक यंत्रणांनी चांगली कामगिरी केली. यामुळे जगतिक स्तरावर अनेक विक्रम तयार झाले. परंतु या निवडणुकीत आमच्याकडून काही चुका झाल्या. निवडणूक रणरणत्या उन्हात घेतली गेली. यापुढे



महिनाभर आधी लोकसभा निवडणूक प्रक्रिया पूर्ण केली जाईल. तसेच आमच्याविरोधात फेक न्यूरेटीव्ह राबवण्यात आले. त्यावर आम्ही काहीच करु शकलो नाही, असे निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी सांगितले. यावेळी जम्मू-काश्मीरमध्येही लवकरच निवडणुका घेण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महिलांच्या बाबत कोणत्याही राजकीय पक्षाकडून चुकीचा शब्द निघायला नको अशी आमची भूमिका होती, असे ते म्हणाले. जम्मू काश्मीरमधे ५८.५८ ¥ मतदान झाले. त्या ठिकाणी अनेक रांगा मतदानासाठी दिसल्या. यामुळे जम्मू काश्मीरमध्ये विधानसभेसाठी आता आम्ही लवकरच मतदान घेणार आहोत. मणिपूरमध्ये ९४ स्पेशल पोलिंग बूथ बनवले होते. ही आमच्यासाठी सक्सेस स्टोरी आहे. २ वर्षाच्या अथक मेहनतीनंतर कुठलाही हिंसाचार न होता या निवडणुका झाल्या आहेत.

## '..तर मला संघर्षाची भूमिका घ्यावी लागेल': शरद पवारांचं मुख्यमंत्री शिंदेंना पत्र

■ मुंबई: नितीन देवळेकर

राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी लोकसभा निवडणुकीच्या निकालच्या आदल्या दिवशीच राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना दोन पानांचं पत्र लिहिलं आहे. हे पत्र शरद पवार यांनीच त्यांच्या एक्स अकाऊंटवरुन शेअर करत मुख्यमंत्र्यांना थेट इशारा दिला आहे. शरद पवारांनी लिहिलेल्या या पत्रामध्ये महाराष्ट्रातील दुष्काळावरुन राज्य सरकारला थेट निर्वाणीचा इशारा दिला आहे. 'राज्यात दुष्काळामुळे जनजीवन अक्षरश: विस्कळीत



झाले आहे. पाण्याच्या टंचाईमुळे बळीराजा आणि सर्वसामान्य त्रस्त झाले आहेत. जनावरांसाठी पाणी आणि चाऱ्याची कमतरता निर्माण झाली आहे. अशा स्थितीत या भीषणतेकडे राज्य सरकारचे लक्ष वेधूनही राज्य सरकारकडून कुठलीही ठोस भूमिका अद्याप घेण्यात आलेली नाही. जर ही दुष्काळाची स्थिती राज्यात कायम राहिली आणि जर राज्य सरकारकडून तातडीने पावलं उचलली गेली नाहीत तर, महाराष्ट्रातील जनतेच्या हितासाठी नक्कीच संघर्षाची भूमिका घ्यावी लागेल! त्यामुळे माननीय मुख्यमंत्री श्री. एकनाथराव शिंदे यांनी राज्यातील दुष्काळ निवारणाबाबत योग्य कार्यवाही करावी, ही अपेक्षा,'

(शेष पृष्ठ २ वर)

## मंत्रालयासमोरची घटना; IAS अधिकाऱ्याच्या मुलीने १०व्या मजल्यावरुन उडी मारत आयुष्य संपवलं

■ मुंबई: माधव अलवा

मुंबईतल्या IAS अधिकाऱ्याच्या मुलीने आत्महत्येचं टोकाचं पाऊल उचलल्याची घटना घडली आहे. IAS अधिकारी विकास रस्तोगी यांच्या मुलीने इमारतीच्या १० व्या मजल्यावरुन उडी मारुन आत्महत्या केली. मंत्रालयाच्या समोर ही इमारत आहे याच इमारतीच्या दहाव्या मजल्यावरुन उडी मारुन या मुलीने आयुष्य संपवलं. रस्तोगी यांची मुलगी वकिलीचं शिक्षण घेत होती. मुंबई पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार या मुलीच्या आत्महत्येचं कारण अद्याप समजू शकलेलं नाही. मात्र या घटनेने प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. विकास



रस्तोगी हे शिक्षण विभागात महत्त्वाच्या पदावर कार्यरत आहेत. लिपी रस्तोगी असं आत्महत्या करणाऱ्या मुलीचं नाव आहे. या मुलीने १० व्या मजल्यावरुन उडी मारली तेव्हा ती खाली उभ्या असलेल्या बाईकवर कोसळली आणि जागीच तिचा मृत्यू झाला. लिपी रस्तोगी ही LLB करत होती. वयाच्या २७ व्या वर्षी तिने इमारतीच्या दहाव्या मजल्यावरुन उडी मारत आयुष्य संपवलं आहे. त्याआधी तिने एक चिठ्ठी लिहिली आहे असंही कळतं आहे मात्र त्याचा तपशील अद्याप समजू शकलेला नाही. मध्यरात्रीच्या सुमारास ही धक्कादायक घटना मुंबईत घडली आहे.

(शेष पृष्ठ २ वर)

## शिवाजी विद्यापीठाच्या माजी प्र कुलगुरूं च्या कारने ६ जणांना चिरडले, अपघातात त्यांचा देखील मृत्यू

■ कोल्हापूर: सचिन कदम

कोल्हापूरमध्ये सोमवारी भीषण अपघाताची घटना घडली. या अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला. एका भरधाव कारने काही दुचाकीस्वारांवर गाडी घातली. कोल्हापूरच्या सायबर चौकात ही अपघाताची घटना घडली. या घटनेतील भरधाव कारने चक्क सहा जणांना चिरडलं. यापैकी ३ जणांचा जागीच मृत्यू झालाय. या अपघातानंतर आता आणखी महत्त्वाची माहिती समोर आली आहे. या अपघातात सहा जणांना चिरडणारी ती कार कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाच्या माजी प्र कलुगुरुंची असल्याची माहिती समोर आली आहे. या अपघातात



त्यांचादेखील मृत्यू झालाय. शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र कुलगुरू व्ही. एम. चव्हाण यांच्या कारने कोल्हापूरच्या सायबर चौकात दुचाकींना धडक दिली. अतिशय भीषण हा अपघात होता. या अपघाताचे सीसीटीव्ही फुटेजदेखील समोर आले आहेत. या अपघाताची दृश्य अक्षरश: अंगावर काटा आणणारी आहेत. शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र कुलगुरू व्ही एम चव्हाण यांची तब्येत बरी नव्हती. तरीदेखील त्यांनी कार चालवल्याची माहिती समोर येत आहे. प्र कुलगुरुं कार चालवत असताना त्यांचा कारवरील ताबा सुटला होता. त्यामुळे ही कार थेट दुचाकींवर जावून चढली. या गाडीने सहा जणांना अक्षरश: चिरडलं.

## पाणीसाठा अवघा ८ टक्के, आता राखीव साठ्यावर भिस्त

■ मुंबई: यश सावंत

मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या सातही धरणांतील पाणीसाठा वेगाने कमी होत असून रविवारी हा पाणीसाठा ८ टक्क्यांपेक्षा कमी झाला



होता. राज्य सरकारने भातसा आणि उर्ध्व वैतरणा धरणातील राखीव साठा वापरण्यास परवानगी दिली आहे. त्यापैकी उर्ध्व वैतरणा धरणातील राखीव साठा वापरण्यास सुरुवात झाली असून भातसा धरणात केवळ साडेतीन टक्के पाणी असून काही दिवसांत या धरणातील राखीव साठ्याच्या वापरालाही सुरुवात होणार आहे. त्यामुळे आता पाण्यासाठी राखीव साठ्यावरच मुंबईकरांची भिस्त आहे. उकाडा प्रचंड वाढत असून सर्वचजण पावसाची वाट बघत आहे. तर धरणातील पाणीसाठा कमी होत असल्यामुळे

(शेष पृष्ठ २ वर)

## आळंदीत लोकसभा निकालानंतर डीजे व फटाके वाजविण्यास बंदी; नियमांचे उल्लंघन केल्यास कडक कारवाई

■ आळंदी: अभिजीत येरल्लू

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीची मतमोजणी व निकाल दि.४ जाहीर होणार आहे. त्यापार्श्वभूमीवर आळंदी शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी आळंदी पोलिसांनी नागरिकांना विविध नियम लागू केले आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यावर कडक कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. आळंदी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा



नरके म्हणाले, पोलीस ठाणे आळंदी हद्दीतील सुजाण नागरिकांना जाहीर आवाहन करण्यात येते की, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने दिनांक १० मार्च २०२४ पासून ते दिनांक ६ जून २०२४ पर्यंत आदर्श आचारसंहिता अंमलात आहे. संपूर्ण देशभरात लोकसभा निवडणूकीचे निकाल मंगळवारी दि. ४ जाहीर होणार आहे.

(शेष पृष्ठ २ वर)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
(३१ मे १७२५–१३ ऑगस्ट १७९५)


राजमाता
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
यांना त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त
विनम्र अभिवादन!

www.mahasamvad.in | /MahaDGIPR | /MaharashtraDGIPR

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय - महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र क्राईम टाइम्स






## पारा आणि धारा!

एकीकडे उन्हाळ्याच्या झळांनी अवघा देश भाजून निघत असताना दुसरीकडे मात्र केरळात पावसाचे आगमन झाल्याची आनंदवार्ताही आली आहे. तिचे मनापासून स्वागत केले पाहिजे. कारण पावसाळ्यासारखा हवाहवासा पाहुणा नाही. त्यातून यंदाचा भाजून काढणारा उन्हाळा पाहता, हा पाहुणा लौकरात लौकर येईल तर बरे, असे वाटू लागले आहे.

या उन्हाळ्यात तापमापकाच्या पाऱ्याने भलतीच ऊर्ध्व दिशा धरली. दिल्लीलगतच्या काही इलाख्यात तर ५२.३ अंश सेल्सियस इतके तापमान नोंदले गेल्याने सगळ्यांच्याच तोंडचे पाणी पळाले. ५२.३ अंश सेल्सिअस. हा काही सामान्य आकडा नव्हे. सेल्सियसच्या मोजपट्टीवर तापमानाने पन्नाशी गाठली की सारे काही आपोआप ठप्प होऊन जाते. पन्नास अंशांच्या वर तापमान जाण्याचा अर्थ तो भूभाग मानवी वस्तीसाठी अनिष्ट मानावा लागतो.

कारण या तापमानात मनुष्यमात्र किंवा बव्हंशी सजीव दम टाकतात. मध्यंतरी एक व्हिडिओफीत समाजमाध्यमांवर फिरत होती. एक लष्करी जवान राजस्थानच्या वाळवंटात तप्त वाळूमध्ये पापड भाजतानाची ही चित्रफीत बरीच बघितली गेली. राजधानी दिल्लीतच तापमान वाढलेले दिसल्यामुळे सारेच चिंतित होणे स्वाभाविक होते.

अर्थात आपल्या हवामानखात्याने मात्र हा स्थानिक वातावरणीय बदल असावा किंवा नोंद तापमापकातील सेन्सरमधल्या दोषांमुळे झाली असावी, असा सावध निष्कर्ष काढला आहे. तसे असेल तर बाब अधिक गंभीर म्हणायला हवी. ग्लोबल वॉर्मिंग आणि वातावरण बदलातील गंभीर बदलांची नोंद घेणारी यंत्रणाच जर आपली उपकरणे सदोष असल्याचे सांगत असेल तर परिस्थिती कठीण आहे.

पाऊसमान कसे आहे, आणि मॉन्सून कधी अवतरणार, याचे अंदाज -अडाखे हा विभाग देत असतो. उपग्रहांच्या साह्यामुळे हल्ली चक्रीवादळाचा तडाखादेखील नेमका कधी बसणार, याची अचूक वेळ सांगता येते. पण ही कामे करणाऱ्या विभागाची तापमान मोजणारी यंत्रणा मात्र चुकीच्या नोंदी करते, यावर विश्वास ठेवणे कठीण जाते. दिल्लीनजीकच्या नजफगढ, नरेला आणि मुंगेशपूर भागात तापमानाने पन्नाशीचा आकडा गाठला किंवा ओलांडला.

बाकीच्या लगतच्या भागामध्ये मात्र हेच तापमान पाच-सहा अंशांनी कमी होते. एवढा फरक कशामुळे पडला, याचा शोध आता हवामानतज्ज्ञ घेत आहेत. या दिवसात दिल्लीची उन्हाने अक्षरश: तंदूरभट्टी होते, याचा अनुभव अनेकांनी घेतला आहे. दिल्लीकर उन्हाळ्याला घाबरत नाहीत. किंबहुना, उत्तरेत या दिवसात उन्हाचा तडाखा असतो.

तथापि, ग्लोबल वॉर्मिंगचा धसका मात्र संपूर्ण जगानेच घेतला आहे, आणि त्याचेच चटके आता बसू लागले आहेत का, हा प्रश्न आहे. तापमान वाढले की देशाचे अर्थकारणही बिघडते. तापमानवाढीचे परिणाम ढोबळमानाने दीर्घकालीन आणि अल्पकालीन असतात. त्यामुळे या नोंदीही अचूक असायला हव्यात. २०२२ मध्ये उग्र उन्हाच्या तडाख्यामुळे भारताचे सुमारे ४.२ अब्ज डॉलरचे नुकसान झाले, आणि भारतात गव्हाचे उत्पादनही कमी झाले, अशी नोंद सापडते.

खरे नुकसानीचे आकडे कितीतरी पटीने अधिक असतील. दीर्घकालीन परिणाम अधिक भयावह आहेत. तापमानवाढीमुळे २०३०पर्यंत भारतातील कामाचे तास सरासरी ५.७ तासांनी घटतील, असा 'आंतरराष्ट्रीय श्रमिक संघटने'चा अंदाज आहे. हे नुकसान जवळपास साडेतीन कोटी रोजगारांच्या बरोबरीचे मानले जाते. शेतकऱ्यांनाही तापमानवाढीमुळे अपरिमित नुकसान सोसावे लागणार आहे.

यंदा दिल्लीच्या आसपासचे तापमान जसे विक्रमी नोंदले गेले, तशीच अवस्था थोड्याफार फरकाने देशात अन्यत्रही दिसली, आणि महाराष्ट्रातही. नागपूर-चंद्रपूर येथेही पारा चढाच राहिला. अकोल्यात तर उन्हाचा ताव पाहून जिल्हाधिकाऱ्यांना जमावबंदीचे १४४ कलम लावावे लागले. यंदाच्या उन्हाळ्यात एकट्या महाराष्ट्रात उष्माघाताची सुमारे पावणेतीनशे प्रकरणे नोंदली गेली. तर देशभरात हा आकडा सोळा हजाराच्या वर जातो.

# १३३ दिवस समुद्रात एकाकी अडकलेल्या सैनिकाची संघर्ष गाथा

**लाईफ ऑफ पाय तुम्ही पाह्यला असेल. जहाज फुटून तराफ्यावर जीव जगवत असलेले 'पाय' पटेल आणि पीटर पार्कर तर आठवत असतीलच. खाणं, पिण्याचं पाणी मिळवणं, सागरी जीवांपासून संरक्षण करणं आणि हे सगळं करत असताना आपणही जगणं.. सिनेमातल्या कल्पना व्हीएफएक्सचय माध्यमातून छान वाटतात. पण असंच काही कुणी खरंच अनुभवलं असेल तर? ते ही थोडेथोडके नाही, १३३ दिवस एकाकी, समुद्रात कंठले असतील तर? तर, आजची गोष्ट आहे दुसऱ्या महायुध्दाच्या दरम्यान अशा संकटात सापडलेल्या एका माणसाची. इतके दिवस एकाकी समुद्रात राहण्याचं त्याच्यानावे रेकॉर्डही आहे. वाचा मग त्याची गोष्ट!!**

काळ होता दुसऱ्या महायुद्धाचा! जमीन, आकाश, समुद्र, सगळीकडेच युद्धाचे सावट पसरले होते. शत्रूराष्ट्राचं सैनिक दिसो, विमान की, जहाज त्यावर हल्ला करायचाच, एवढंच युद्धाचं सूत्र! अशातच केप टाऊनहून सुरीनामसाठी एक ब्रिटिश जहाज चालले होते. अमेझॉनच्या पूर्वेकडून जाताना जर्मन जहाजाने लक्ष्य या ब्रिटिश जहाजावर पडले आणि त्यांनी लागलीच या जहाजाला छेदण्यासाठी टर्पोइडच्या सहाय्याने हल्ला केला आणि त्याचे दोन तुकडे करून टाकले. जहाजावर एकूण ५३ लोक होते आणि यातील फक्त एकच माणूस वाचला, ज्याचे नाव होते पूँ ली. पूँ ली हा चीनचा रहिवासी, मात्र त्याच्या वडिलांनी त्याला ब्रिटिश जहाजांवर नोकरीसाठी पाठवले. देशातच राहयला तर त्याला सक्तीने युद्धासाठी नेले जाईल अशी त्यांना भीती होती. चीनच्या हैनान प्रांतातील पूँ लीचे फक्त हायस्कूलपर्यंतचे शिक्षण झाले होते. म्हणून तो बेन लेमंड या ब्रिटिश जहाजावर मदतनीस म्हणून काम करत होता. यू-१७२ या जर्मन युद्ध नौकेने त्या ब्रिटिश जहाजांवर हल्ला केल्यानंतर जहाजाचा स्फोट होण्याआधीच पूँ लीने अंगात लाईफ जॅकेट चढवले आणि त्याने पाण्यात उडी मारली. पूँ लीला पोहता येत नव्हते, पण लाईफ जॅकेटच्या साहाय्याने तो तरंगत राहयला. दोन तासानंतर त्याला साधारण आठ-फुटांचा एक चौकोनी तराफा सापडला. तातडीने तो तराफा पकडून त्यावर चढला. पूँ लीच्या सुदैवाने त्या तराफ्यावर पाण्याचे कॅन, बिस्किट पुड्यांचे बॉक्सेस, साखरेची गोणी, दोन चुली, काही मशाली आणि टॉर्च होत्या.

पूँ लीला या शिदोरीच्या आधाराने काही दिवस निवांतपणे काढता आले, पण काहीच दिवसांत त्याची ही शिदोरी संपून गेली. त्याच्याजवळचे पिण्याचे पाणीही संपले. तेव्हा तो पावसाचे पाणी साठवून ठेऊ लागला. खाण्याचे साहित्य संपले तेव्हा मासे धरून ते उन्हात वाळवून खाऊ लागला. मासे धरण्यासाठी तो त्या तरफ्यावरील दोर आणि खिळयांचा वापर करत असे. एक पत्र्याच्या डब्यापासूनच त्याने चाकूही बनवला होता.

त्याला पोहता येत नव्हते, पण तराफ्याच्या सहाय्याने तो कसाबसा




पाण्यावर तग धरून राहील होता. कधी कधी त्याच्या या तराफ्याजवळ शार्क येत. तो शार्कचीही शिकार करत असे. एखादा मोठा शार्क सापडला की बरेच दिवस त्याची त्यावर गुजराण चालत असे. पण पिण्याच्या पाण्याचा प्रश्न होताच. कारण मध्येच पावसाने दडी मारली होती. मग शार्कचे रक्त पिऊनच त्याने आपली तहान भागवली होती.

उन्हाचे चटके सोसवत नव्हते. खाण्यापिण्याचे हाल तर होतेच, पण येणारी जाणारी एकही बोट आपल्या मदतीसाठी येत नाही हे येणारी विषण्णता आणि खिन्नता जास्त मोठी होती. मासे वाळवून खाण्याची तशीही त्याला सवय होती. मात्र अशा अवस्थेत किती दिवस जाणार, आपल्या घरी सुखरूप पोहोचू की नाही, की असेच, इथेच मरून जाऊ की काय? अशा प्रश्नांची उत्तरे त्याला काही केल्या मिळत नव्हती.

किमान दिवस मोजण्यासाठी म्हणून तो आधी एका दिवसाला एक गाठ मारून ठेवी, नंतर नंतर त्याने तेही सोडून दिले. पण अशा गाठी किती दिवस मारणार असा विचार करून त्याने फक्त पौर्णिमेच्या दिवशीच गाठी मारण्याचे ठरवले. डोक्यावरून विमाने जात होती, समोरून अनेक जहाजे जात होती. मात्र त्याला मदत करण्यास कुणीही उत्सुक नव्हते.

एकेक करत तब्बल १३३ दिवस गेले आणि एकेदिवशी एक ब्राझिलियन मासेमाऱ्याला पूँ ली दिसला आणि त्यांनी त्याला मदत केली. या मच्छीमारांच्या मदतीमुळे पूँ ली आपल्या घरी सुखरूप पोहोचला. पण या दिवसांत त्याने जे अनुभव घेतले होते त्यांनी त्याच्या मनावर आणि शरीरावरही गहिरे घाव दिले होते. तो प्रचंड अशक्त झाला होता. त्याचे ९ किलो वजन कमी झाले होते. घरी परतल्यावर त्याला काही दिवस हॉस्पिटलमध्ये काढावे लागले. समुद्रात आजवर कुणीही इतके दिवस काढले नव्हते, म्हणून समुद्रात १३३ दिवस एकटे राहण्याचा विक्रम पूँ लीच्या नावावर नोंदवला गेला आहे. हा विक्रम तोडण्याची संधी पुन्हा कुणालाही मिळू नये अशी प्रार्थना करतो असे पूँ ली म्हणत असे. या घटनेनंतर पूँ लीला भरपूर प्रसिद्धी मिळाली. ब्रिटिश किंग जॉर्ज सहावा याने त्याला ब्रिटिश एंपायर मेडल देऊन सन्मानित केले. ब्रिटनच्या शाही नौदलाने त्याच्या जिवंत राहण्याची ही कथा आपल्या दप्तरात नोंदवून ठेवली आहे.

दुसरे महायुद्ध सपल्यानंतर त्याने अमेरिकन नागरिकत्व मिळवण्यासाठी अर्ज केला होता. पण चीनी विस्थापितांचा कोटा पूर्ण झाल्याने त्याला अमेरिकन नागरिकत्व नाकारण्यात आले. परंतु त्याची ख्याती सिनेटर वॉरेन मॅग्नुसन यांच्यापर्यंत पोहोचलेली असल्याने त्याला विशेष सवलत देत अमेरिकन नागरिकत्व बहाल केले. कठीण प्रसंग गुदरल्यावर अनेक जण संघर्ष करण्याच्या मनस्थितीतही नसतात, पण पूँ लीने आलेल्या प्रसंगाला स्वीकारत धैर्याने त्यावर मात केली.

# मधुमेहाचे शरीरावरील गंभीर परिणाम

मधुमेह नावातच गोडवा असणारा परंतु आयुष्यातील गोडी कमी करणारा आजार. दुर्दैव असे की हा आजार जगभरात अक्राळ-विक्राळपणे पाय पसरत आहे आणि भारतात रुग्णसंख्या वेगाने वाढत आहे. अलीकडे तर अगदी तरुण वयोगटालाही या आजाराने ग्रासले असून यासोबतच हृदयविकार, मूत्रपिंडाचे आजार, रक्तदाब या आजारांनाही घेऊन येत आहे. ग्लुकोज वाढते ते रक्तात आणि रक्त सर्व शरीरात फिरते. त्यामुळे साहजिकच शरीरातील अनेक इंद्रियांनाही याचा उपद्रव होणारच. परंतु याकडे मात्र दुर्लक्ष केले जात आहे.

जागतिक मधुमेह दिनाच्या निमित्ताने या मधुमेहाशी निगडित आणि नजरेआड पडत चाललेल्या विषयांना भिडणे आवश्यक वाटते. कारण मधुमेह हा रक्तातील ग्लुकोज वाढणे यापुरता मर्यादित नसून त्याचे अनेक पैलू आहेत.

पहिला पैलू म्हणजे रक्तात साचलेल्या अतिरिक्त ग्लुकोजचे चरबीत रूपांतर होते. वैद्यकीय भाषेत याला 'ट्रायगलसीराइड' वाढतात. मग आपल्याला चरबीची पुटे चढू लागतात. पोट, कंबर, मांड्या या जागा फुल्ल व्हायला लागतात. तरीही अतिरिक्त चरबी बनत राहते, रक्तात येत राहते. अपरिहार्यता म्हणून मग ही चरबी इतर इंद्रियांमध्ये आपले बस्तान बसवायला लागते. स्नायू, यकृत अशा ठिकाणी साचायला लागते. त्या इंद्रियांच्या कार्यात अडथळे निर्माण करू लागते.

त्यामुळे मधुमेहींमध्ये फॅटी लिव्हर किंवा चरबी साचलेले यकृत अनेकदा दिसते. यात दुखत नाही, खुपत नाही आणि निदानही लवकर होत नाही. या ना त्या कारणाने पोटाची सोनोग्राफी केल्यावर निदान होते. इंद्रियांमध्ये साचलेली चरबी निरूपद्रवी आहे असा दावा करता येत नाही. किंबहुना साधारण १० ते १५ टक्के लोकांमध्ये ती उपद्रव करते. यकृत हे शरीराच्या महत्त्वाच्या घडामोडींचे महत्त्वाचे केंद्र असते. त्याच्या कामात अडचणी निर्माण झाल्यास साहजिकच शरीराची घडी बिघडते. यकृतामध्ये नैसर्गिकरीत्या बराच काळ असले आघात सहन करण्याची क्षमता असते. पण इथेच खरी मेख आहे. क्षमता जास्त असली की इंद्रियात होणारा बिघाड लक्षात येण्यासाठी लक्षणेही लवकर दिसून येत नाहीत. त्यामुळे हा आजार कधी कधी पुढच्या काळातील प्रश्नांची नांदीही ठरू शकतो. त्यात रुग्ण मद्यसेवन करत असल्यास यावर



आणखीनच लवकर परिणाम होणार. त्यामुळे फॅटी लिव्हर, सिरहोसिसमध्ये परावर्तित होण्याआधी त्याची दखल घेणे गरजेचे आहे. तसेच आपल्याला झालेला फॅटी लिव्हरची समस्या भविष्यात मोठा गोंधळ निर्माण करणारी नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. यासाठी आपल्या डॉक्टरांशी चर्चा करावी.

दुसरा दुर्लक्षित प्रश्न पायांचा. पायांना जखम होणे पाय कापावे लागणे हेही मधुमेहीमधील महत्त्वाची समस्या आहे. मधुमेहात जशा हृदयाच्या रक्तवाहिन्या चोंदतात तसे इतर ठिकाणच्या रक्तवाहिन्याही चोंदतात. पायाच्या बाबतीत खूप उशिरापर्यंत हे लक्षात येत नाही. हृदयाच्या बाबतीत थोडे चालल्यावर छातीत दुखायला किंवा दम लागायला लागतो. याबाबत आपण बरेच सजग असल्याने ही लक्षणे मनावर घेतो. इतर तपासण्या करतो. पायाच्याबाबत मात्र असे होत नाही. पायामध्ये चालल्यावर गोळे येतात, पाय लटकवून बराच काळ बसल्यास पांढरे पडतात अशी लक्षणे दिसत असतात. परंतु वेदनाशामक औषधे घेण्यापलीकडे काहीच केले जात नाही. डॉप्लर किंवा पायाच्या रक्तवाहिन्यांची अँजियोग्राफी हे तर फार दूरच. मग ही लक्षणे वाढत जातात आणि एक दिवस पाय कापण्याची वेळ येते. परंतु तोपर्यंत खूप उशीर झालेला असतो. अँजियोग्राफी करून रक्तपुरवठा पूर्ववत करणे आता शक्य आहे, परंतु या सुविधाही शहरापुरत्या मर्यादित आहेत. तिसरा आणि महत्त्वाचा प्रश्न म्हणजे मूत्रपिंडाच्या रक्तवाहिन्यांमध्ये अशाच प्रकारे रक्तपुरवठ्यात अडथळा निर्माण होणे. इथेही वेदना होत नसल्यामुळे निदान फार उशिरा होते. मूत्रपिंड निकामी होण्याचे हेही एक महत्त्वाचे कारण आहे. मूत्रपिंडामध्ये कोणतीही लक्षणे दिसत नसल्यामुळे ही समस्या अधिक जटिल आहे. यावरून आता हे धोके ओळखायचे कसे हा प्रश्न नक्कीच निर्माण झाला असेल. मूत्रपिंडाचा रक्तदाबाशी संबंध येतो. मधुमेहात रक्तदाब नियंत्रित राखणे तसे आव्हानात्मक. साधारण दोन ते तीन औषधे घेतल्यावरही रक्तदाब नियंत्रणात नसेल तर सावध व्हायला हवे आणि मूत्रपिंडाच्या तपासण्या करायला हव्यात. मधुमेहात अशी अनेक लक्षणे किंवा समस्या आहेत, ज्या संकेत देत असतात. तेव्हा याकडे वेळीच लक्ष देणे आवश्यक असून आपल्या डॉक्टरांच्या सतत संपर्कात राहून शरीराची योग्य काळजी घेणेही गरजेचे आहे. केवळ मधुमेह नियंत्रण नव्हे तर शरीरात होणाऱ्या अनेक बदलांचीही दखल घेणे हे महत्त्वाचे आहे.

पान १ वरुन...

## उद्धव ठाकरें 'त्या'...

तसेच मतदानासाठी नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. त्याबाबातही त्यांनी भाष्य केलं होतं. यानंतर भारतीय जनता पक्षाने यावर आक्षेप घेतला होता. तसेच उद्धव ठाकरे यांच्यावर कारवाई करण्यात यावी, यासाठी भाजपा नेते आशिष शेलार यांनी निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. यानंतर आता केंद्रीय निवडणूक आयोगाने आवश्यक ती कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले होते. तसेच काही ठिकाणी निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांकडून मुद्दामहून मतदानाला दिरंगाई करण्यात येत असल्याने मतदारांना त्रासाला सामोरं जावं लागत आहे, असंही उद्धव ठाकरे यांनी म्हटलं होतं.

'आम्ही आतापर्यंत निवडणूक आयोगाला अनेक पत्र लिहिले, त्यावर निवडणूक आयोगाने काहीही कारवाई केली नाही. जी कारवाई करायची ती करुद्या आम्ही स्वागत करतो', अशी प्रतिक्रिया ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी निवडणूक आयोगाच्या कारवाईच्या आदेशासंदर्भात माध्यमांशी बोलताना दिली.

## '..तर मला संघर्षाची...

असं शरद पवार हे पत्र शेअर करताना म्हटले आहेत. शरद पवारांच्या पत्रात काय म्हटलं आहे वाचा हे पत्र जसच्या तसं... मी मागील महिन्यात २४ मे रोजी पत्रकार परिषद घेऊन महाराष्ट्र राज्यातील गंभीर दुष्काळी परिस्थितीकडे राज्य सरकारचे लक्ष वेधले होते. सदर पत्रकार परिषदेत मी राज्य सरकारशी सहकार्य करण्याची आणि दुष्काळी परिस्थितीला एकत्रितपणे सामोरे जाण्याची भूमिका घेतली होती. आपण देखील आदल्या दिवशी छत्रपती संभाजीनगर येथे मराठवड्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला होता. मात्र या महत्त्वपूर्ण बैठकीत संबंधित लोकप्रतिनिधी व मंत्री गैरहजर होते. आपण सदर बाबीची योग्य ती दखल घेतली असेलच. मात्र राज्य सरकार अध्यापही अंग झटकून कामाला लागल्याचे दिसत नाही, हे मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

मागील १० दिवसांत दुष्काळी परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. राज्यातील उजनी, जायकवडी सारखी महत्त्वाची धरणे आटली आहेत. संपूर्ण मराठवाडा दुष्काळात होरपळत आहे. त्याची झळ लगतच्या उत्तर महाराष्ट्र, विदर्भ विभागाला देखील बसली आहे. धुळे, नंदूरबार, नाशिक जळगाव, सोलापूर, अहमदनगर, यवतमाळ, अकोला, बुलढाणा जिल्ह्यांमध्ये पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. शहरी आणि ग्रामीण भागातील जनता पाण्यासाठी तहानलेली आहे. मराठवड्यासह पुणे जिल्ह्यातील पुरंदर, दौंड, बारामती, इंदापूर, सातारा जिल्ह्यातील माण-खटाव, कोरेगाव आणि सांगली जिल्ह्यातील जत, आटपाडी या तालुक्यांतील पाणीटंचाई परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. दुष्काळी परिस्थिती हाताळताना मी राज्य सरकारशी सातत्याने सहकार्याची भूमिका घेत आलो आहे. परंतू या भीषण दुष्काळी परिस्थितीत जनतेचे हाल पाहून स्वस्थ राहणे कठीण झाले आहे. दुष्काळ निवारणाच्या कामात राज्य सरकारने तातडीने पावले उचलावीत असे मी आवाहन करतो. मात्र त्यानंतरही काही आश्वासक बदल न दिल्यास मला संघर्षाची भूमिका घ्यावी लागेल, हे स्पष्टपणे नमूद करतो.

## मंत्रालयासमोरची घटना...

मुलीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. आयएस अधिकाऱ्याच्या मुलीने अशा प्रकारे आयुष्य संपवल्याने या घटनेची चर्चा होते आहे. या मुलीची आई राधिका रस्तोगी या चलन विभागात सचिव आहेत.

मुंबईत मंत्रालयासमोर सुनीती नावाची इमारत आहे. या इमारतीच्या दहाव्या मजल्यावरुन उडी घेत लिपी रस्तोगीने आत्महत्या केली. ज्या इमारतीत लिपी आणि तिच्या आई वडिलांसह राहात होती तिथे आयएएस अधिकारी आणि काही मंत्र्यांची घरं आहेत. पहाटे तीनच्या सुमारास लिपीने उडी मारली, ज्यानंतर तिला जीटी रुग्णालयात नेण्यात आलं पण तिचा जागीच मृत्यू झाला असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. या प्रकरणी पोलिसांनी अनसैर्गिक मृत्यूची नोंद करुन पुढील तपास सुरु केला आहे.

## पाणीसाठा अवघा...

पालिकेच्या यंत्रणेचेही पावसाच्या आगमनाकडे लक्ष लागले आहे. मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या उर्ध्व वैतरणा, मोडक सागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार, तुळशी अशा सातही धरणांतील पाणीसाठा सध्या केवळ ७.५९ टक्क्यांवर आला आहे. हा पाणीसाठा गेल्या तीन वर्षांतील सर्वात कमी आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही धरणांत मिळून १ लाख ९ हजार ८९० दशलक्षलीटर म्हणजेच ७.५९ टक्के पाणीसाठा आहे. गेल्यावर्षी २०२३ मध्ये २ जूनरोजी पाणीसाठा १२.२८ टक्के होता तर त्याआधीच्यावर्षी पाणीसाठा १७.०३ टक्के होता.

मुंबईला दर दिवशी ३८०० दशलक्षलीटर पाण्याचा पुरवठा केला जातो. पालिकेच्या नियोजनानुसार एक टक्का पाणी मुंबईकरांची तीन दिवसांची मागणी पूर्ण करते. म्हणजेच महिन्याला सुमारे १२ ते १३ टक्के पाण्याचा वापर होतो. मात्र उन्हाच्या झळा बसू लागल्या असून उन्हामुळे पाण्याची मोठ्या प्रमाणावर वाफही होते असते. तसेच जूनमध्ये पावसाला पुरेशी सुरुवात होत नाही. त्यामुळे धरणातील पाणी जुलै महिन्यापर्यंत पुरवावे लागते. मात्र यंदा पाणीसाठा वेगाने खालावला असून राखीव साठा वापरण्याची वेळ आली आहे. तसेच राज्य सरकारने मुंबई महानगरपालिकेला राखीव साठा वापरण्यास परवानगी दिली आहे. त्यानुसार भातसा धरणातून १ लाख ३७ हजार दशलक्ष लिटर तर उर्ध्व वैतरणा धरणातून ९१,१३० दशलक्षलीटर राखीव साठ्याचे पाणी उपलब्ध झाले आहे. हे पाणी जुलै महिनाअखेरपर्यंत पुरवावे लागणार आहे. धरणांमध्ये थोडे पाणी असल्यामुळे यंदा आतापर्यंत राखीव साठा वापरण्याची वेळ आली नव्हती. मात्र उर्ध्व वैतरणा धरणातील पाणीसाठा शून्यावर आला असून या धरणातील राखीव साठ्याच्या वापराला सुरुवात झाल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली. तर शहराला दररोज सर्वाधिक म्हणजे १८५० दशलक्षलीटर पाणीपुरवठा करणाऱ्या भातसा धरणात केवळ ३.३३ टक्के पाणीसाठा आहे. त्यामुळे येत्या एक दोन दिवसांत भातसा धरणातील राखीव साठा देखील वापरावा लागणार आहे.

## आळंदीत लोकसभा निकालानंतर...

कोणीही नागरिक सदर निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर सोशल मीडियाद्वारे फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाट्सअप ग्रुप व इतर तत्सम एप्लीकेशनच्या माध्यमांद्वारे कोणत्याही समाजांच्या, जातीच्या, धर्माच्या भावना दुखावतील अशा स्वरूपाच्या पोस्ट, कॉमेंट्स, स्टोरी, स्टेटस, डिजिटल बॅनर असे प्रकार वरील माध्यमांद्वारे करू नयेत. तसेच कोणाचेही विरोधात घोषणाबाजी करू नये.

निकालानंतर डीजे वाजवणार नाहीत, फटाके फोडणार नाहीत. तसेच विनापरवाना विजयी मिरवणूक काढू नये. व्हाट्सअप ग्रुपचे ॲडमिन यांनी दिनांक ३ जून ते दिनांक ६ जून या कालावधीमध्ये त्यांच्या ग्रुपच्या सेटिंगमध्ये 'ओन्ली ॲडमीन' असा बदल करून घ्यावा. जेणेकरून ग्रुप मधील कोणताही सदस्य वादग्रस्त पोस्ट ग्रुपवर टाकणार नाहीत. जर ॲडमीन यांनी सेटिंग मध्ये बदल केला नाही व कोणी सदस्याने वादग्रस्त पोस्ट टाकल्याने काही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास पोस्ट करणाऱ्या सदस्यासह ग्रुप ॲडमीनला जबाबदार धरून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल असा इशाराही आळंदी पोलिसांनी दिला आहे.

## कमी किमतीत सोने खरेदीचे प्रलोभन, महिलेला २८ लाखांचा गंडा

■ **मुंबई: विशेष प्रतिनिधी**

बाजारभावापेक्षा कमी किमतीत अर्धा किलो सोने देण्याचे प्रलोभन दाखवून महिला बॅंक व्यवस्थापकला तब्बल २७ लाख ८१ हजार रुपयांना



लुटल्याची घटना घडली होती. या प्रकरणातील फरार टोळीतील दोघांना नेरूळ पोलिसांनी बुधवारी (ता. २९) अटक केली. राकेश शिवाजी शिंगटे (वय ४२) व रूपेश सुभाष सपकाळे (वय ४२) हे १८ मे रोजी नेरूळमधील डी. वाय. पाटील कॉलेजच्या गेटवरून ही रक्कम घेऊन पसार झाले होते. तक्रारदार ३८ वर्षीय महिला कामोठे येथे राहत असून, त्या एका बॅंकेत व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. राकेश शिंगटे या बॅंकेच्या खातेदारासोबत त्यांची ओळख झाली होती.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4 , Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate , Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com , Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# नालेसफाईतील हलगर्जीप्रकरणी कंत्राटदारांवर कारवाई, एकूण ५४ लाख ६८ हजार रुपयांची दंड आकारणी

**■ मुंबई: यश सावंत**

**महानगरपलिकेने हाती घेतलेले नाल्यांमधील गाळ काढण्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून नाल्यातून गाळ काढण्याच्या कामात निष्काळजीपणा आणि त्रुटी आढळून आल्यामुळे पालिकेने कंत्राटदारांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. नालेसफाईतील हलगर्जीप्रकरणी वेगवेगळया कंत्राटदारांना एकूण ५४ लाख ६८ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.**

पावसाळापूर्व कामांचा भाग म्हणून मुंबई महानगरातील नद्या आणि नाल्यांमधील गाळ काढण्यात येत आहे. मात्र, अनेकदा कंत्राटदारांकडून कामात हलगर्जीपणा केला जातो. परिणामी, मुंबईकरांना पावसाळ्यात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. यंदा नालेसफाईचे काम अधिक प्रभावी व पारदर्शक पद्धतीने पार पाडावे, यासाठी पालिकेने नालेसफाईच्या कंत्राटात काही नव्या अटींचा समावेश केला आहे. मात्र, तरीही काही कंत्राटदारांकडून नालेसफाईच्या कामांत निष्काळजीपणा करण्यात आल्याचे निदर्शनास आले. नालेसफाईत कोणताही निष्काळजीपणा होऊ नये यासाठी कामात हलगर्जी करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करण्याचा निर्णय पालिकेने घेतला.

मुंबई शहर आणि दोन्ही उपनगरांतील कंत्राटदारांना एकूण ५४ लाख ६८ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. पालिका प्रशासनाने शहर विभागातील नालेसफाई निष्काळजीपणा करणाऱ्या कंत्राटदारांना ३१ लाख ६५ हजार दंड ठोठावला आहे. तसेच, पूर्व उपनगरात २२ लाख ५५ हजार तर, पश्चिम उपनगरातील कंत्राटदारांवर १० लाख ४८ हजार रुपयांची



दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. कंत्राटदारांकडून ज्यावेळी कामाचे बिल जमा केले जाईल, त्यावेळी बिलामधूनच दंडाची रक्कम वसूल करण्यात येणार आहे, असे पालिकेकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

दहिसर विभागातील खराब रस्ते, रस्त्यांची अर्धवट कामे, वाहतूककोंडी, नालेसफाईतील त्रुटींविरोधात शिवसेना कार्यकर्त्यांनी (ठाकरे गट) पालिकेच्या आर उत्तर विभाग कार्यालयावर बुधवारी धडक मोर्चा काढला. शिवसेना उपनेते व माजी आमदार विनोद घोसाळकर यांच्या नेतृत्वात हा मोर्चा काढण्यात आला. दहिसर पूर्व आणि पश्चिमेतील अनेक परिसरात कायम वाहतूककोंडी असते. तसेच, नागरिकांना स्वच्छ, निरोगी हवाही मिळत नाही. दरम्यान, विनोद घोसाळकर यांनी दहिसरमधील रस्ते व नाल्यांची पाहणी केली. त्यावेळी अनेक ठिकाणच्या कामांत हलगर्जीपणा दिसून आल्यामुळे महापालिकेच्या कारभारावर घोसाळकर यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली.

याच पार्श्वभूमीवर, बुधवारी पालिकेच्या आर उत्तर विभाग कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाला बुधवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास दहिसर पूर्व येथील आनंदनगर मेट्रो स्टेशन जवळच्या शिव मंदिरापासून सुरुवात करण्यात आली. यावेळी महिला मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी झाल्या होत्या. पालिकेच्या भोंगळ कारभाराविरोधात जोरदार घोषणाबाजी करून पालिकेचा निषेध करण्यात आला. मुंबई महापालिकेकडून नालेसफाईसाठी कोट्यवधी रुपये खर्च होत असताना नालेसफाई योग्यरीत्या होत नाही. संपूर्ण दहिसरमधील नाल्यांची पाहणी केली असता तेथील गाळ उचलण्यात आलेला नाही, असा आरोप घोसाळकर यांनी केला.

# पाच वर्षांमध्ये २० हजार नागरिक तंबाखूच्या व्यसनातून मुक्त; टाटा रुग्णालयाच्या 'तंबाखू क्विट लाईन' उपक्रमाला प्रतिसाद

**■ मुंबई: रघुवीर जाधव**

तंबाखू सेवनामुळे कर्करोग होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे टाटा रुग्णालयाने पाच वर्षांपूर्वी हाती घेतलेल्या 'तंबाखू क्विट लाईन' उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये या उपक्रमांतर्गत २० हजार नागरिक तंबाखूच्या व्यसनातून मुक्त झाले आहेत. त्यामुळे टाटा रुग्णालयाच्या डॉक्टरांच्या प्रयत्नांना यश येत आहे.



केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या निर्देशानुसार फेब्रुवारी २०१९ मध्ये 'तंबाखू क्विट लाईन' उपक्रम सुरू करण्यात आला. या उपक्रमांर्गत तंबाखूचे सेवन करणाऱ्यांचे समुपदेशन करण्यात येत असून त्यांना तंबाखू सेवनापासून दूर राहण्यासाठी मदत करण्यात येत आहे. देशामध्ये सुरू करण्यात आलेल्या चार 'तंबाखू क्विट लाईन' केंद्रांपैकी एक केंद्र खारघर येथील टाटा रुग्णालयाच्या ॲक्ट्रेक्ट केंद्रामध्ये आहे. यासाठी ॲक्ट्रेकचे संचालक डॉ. पंकज चतुर्वेदी यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.

महाराष्ट्र, गोवा, गुजरात आणि दिव-दमण येथील नागरिकांच्या समुपदेशानची जबाबदारी या केंद्रावर आहे. अन्य तीन 'क्विट लाईन' केंद्रे दिल्ली, गुवाहाटी आणि बंगळूरू येथे आहेत. 'तंबाखू क्विट लाईन'वर संपर्क साधण्यासाठी नागरिकांना मदत क्रमांक १८००११२३५६ उपलब्ध करण्यात आला आहे.

'क्विट लाईन'चे काम दोन पाळ्यांमध्ये चालते. तसेच या केंद्रांवर नागरिकांचे समुपदेशन करण्यासाठी १६ तज्ज्ञांची तुकडी कार्यरत आहे. या मदत क्रमांकावर दररोज एक हजाराहून अधिक दूरध्वनी येत असल्याची माहिती टाटा मेमोरियल केंद्राच्या सेंटर फॉर कॅन्सर एपिडेमियोलॉजीचे संचालक डॉ. राजेश दीक्षित यांनी दिली. धूम्रपान करणाऱ्या व्यक्तीला रुग्णालयात जायचे नसते. त्यामुळे तंबाखू सेवनाची सवय सोडण्यासाठी दूरध्वनी हे एक प्रभावी माध्यम आहे. तंबाखूच्या सेवनाच्या सवयीमुळे गंभीर आजार जडू शकतात. त्यामुळे ही सवय सोडण्यासाठी मित्र आणि कुटुंबियांची मदत घेण्याचा सल्ला देण्यात येतो, असे क्विटलाइनचे प्रभारी आणि एपिडेमियोलॉजीचे प्राध्यापक डॉ. अतुल बुदुख यांनी सांगितले.

# म्हाडाच्या मुंबईतील १७३ दुकानांचा ११ जूनला ई लिलाव

**■ मुंबई: सचिन कदम**

म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या मुंबईतील विविध ठिकाणच्या १७३ दुकानांच्या ई लिलावासाठी अखेर मुहुर्त मिळाला आहे. ११ जूनला या दुकानांचा ई लिलाव केला जाणार आहे. या ई लिलावातून मुंबई मंडळाला किमान १२५ कोटी रुपयांच्या महसुलाची अपेक्षा आहे. मुंबई मंडळाने आपल्या गृप्रकल्पातील दुकानांच्या ई लिलाव पद्धतीने विक्री करण्याचा निर्णय घेत फेब्रुवारीत १७३ दुकानांच्या ई लिलावासाठी जाहिरात प्रसिद्ध केली. तर १ मार्चपासून नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृती, बोली निश्चिती अशा प्रक्रियेस सुरुवात केली. जाहिरातीनुसार २० मार्चला दुकानांचा ई लिलावा होणार होता. मात्र त्याआधीच मुंबई मंडळाने दुकानांचा २० मार्चचा ई लिलाव रद्द करत नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृती आणि बोली निश्चितीला मुदतवाढ दिली. आचारसंहिता आणि ई लिलावाला चांगला प्रतिसाद मिळावा यासाठी ५ जूनपर्यंत ही मुदतवाढ देण्यात आली. तर मुदतवाढ देताना ई लिलावाची तारीख मात्र जाहीर केली नाही. पण आता मात्र आचार संहिता संपुष्टात येणार असून ५ जूनची मुदतही संपणार आहे. त्यामुळे आता ई लिलावासाठी मंडळाने तारीख निश्चित केली आहे.




११ जूनला १७३ दुकानांचा ई लिलाव होणार असल्याची माहिती मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. या तारखेची अधिकृत घोषणा लवकरच होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. तर १७३ दुकानांना कसा प्रतिसाद मिळाला आहे, किती अर्ज दाखल झाले आहे हे ५ जूननंतरच स्पष्ट होणार आहे.

# 'मेट्रो २ अ', 'मेट्रो ७' आणि मोनोरेलसाठी आपत्कालीन नियंत्रण कक्ष कार्यान्वित

**■ मुंबई: माधव अलवा**

'दहिसर – अंधेरी पश्चिम मेट्रो २ अ', 'दहिसर – गुंदवली मेट्रो ७' आणि चेंबूर – जेकब सर्कल मोनोरेलसाठी स्वतंत्र पावसाळी आपत्कालीन नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. दोन्ही मेट्रो मार्गिका आणि मोनोरेलच्या संचलन, तसेच देखभालीची जबाबदारी असलेल्या महामुंबई मेट्रो संचलन महामंडळाने (एमएमएमओसीएल) हा कक्ष कार्यान्वित केला आहे. तसेच पावसाळ्याच्या दृष्टीने मेट्रो, मोनोच्या देखभाल-दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. तर पावसाळ्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजनाही करण्यात आल्या आहेत. पावसाळयात मेट्रो २ अ, मेट्रो ७ आणि मोनोची सेवा सुरळीत



रहावी, पावसाळयात अडचणी आल्यास तात्काळ त्याचे निवारण व्हावे यासाठी हा कक्ष कार्यरत असणार आहे. हा कक्ष २४ तास कार्यरत असणार असून हा कक्ष मुंबई महानगरपालिकेच्या आपत्कालीन नियंत्रण कक्षाशी संलग्न असणार आहे. मेट्रो आणि मोनोच्या प्रवाशांना आपत्कालीन परिस्थितीत हेल्पलाईन क्रमांक १८००८८९०५०५/ १८००८८९०८०८ वर संपर्क साधावा. तसेच नागरिकांना मोनोरेलच्या आपत्कालीन नियंत्रण कक्षाशी मोबाइल क्रमांक ८४५२९०५४३४ वरून संपर्क साधता येईल. पावसात हवेच्या वेगाचे निरीक्षण करून मेट्रो कार्यान्वयनाचे अचूक नियोजन करण्याच्या दृष्टीने मेट्रो २ अ आणि ७ च्या दहा मेट्रो स्थानकांवर ॲनिमोमीटर बसविण्यात आले आहेत.

# धारावी प्रीमियर लीगदरम्यान ड्रोनचा बेकायदेशीर वापर, शाहू नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**■ मुंबई: विशाल कारंडे**

धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे कंत्राट मिळालेल्या अदानी समूहाने ३१ मे २ जून दरम्यान धारावीमध्ये 'धारावी प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धे'चे आयोजन केले आहे. या स्पर्धेत बेकायदेशीररित्या ड्रोनचा वापर केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शाहूनगर पोलीस ठाण्यात याप्रकरणी छायाचित्रकाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धारावी पुर्नविकासास धारावीकरांचे समर्थन मिळत आहे, हा संदेश देण्यासाठी तसेच स्थानिक खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी ही स्पर्धा आयोजित केल्याचे अदानी समूहाकडून सांगण्यात येत आहे. यानंतरही अशा स्पर्धा आयोजित करण्यात येणार असल्याचेही अदानी समूहाकडून सांगितले जात आहे. मात्र धारावी प्रीमियर लीग



आता वादात अडकली आहे. या स्पर्धेत ड्रोनचा वापर करण्यासाठी कोणतीही परवानगी घेण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे शाहू नगर पोलिसांनी बेकायदेशीररित्या ड्रोनचा वापर केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

# १२ वर्षांनंतरही गहाळ १,४०१ नस्तींचे प्रकरण गुलदस्त्यातच

**■ मुंबई: नितीन देवळेकर**

मुंबई पालिकेच्या विकास नियोजन विभागातून तब्बल १,४०१ नस्ती (फाइल्स) गायब झाल्याचे उघडकीस आले होते. या इमारतींच्या नस्ती पुनर्स्थापित करण्यात आल्या की नाही, तसेच या प्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल झाला का, हे १२ वर्षांनंतरही गुलदस्त्यातच असल्याचे माहिती अधिकारातून उघडकीस आले आहे. त्यामुळे पालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून या इमारतींच्या अस्तित्वाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

गेल्या काही दशकांत मुंबईत पुनर्विकासाचे जोरदार वारे वाहू लागले आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियोजन विभागाकडून आवश्यक पडताळणी करून इमारतींच्या पुनर्विकासाला परवानगी दिली जाते. पश्चिम उपनगरांतील गोरेगावपासून दहिसरपर्यंतच्या टापूतील इमारतींच्या तब्बल १,४०१ नस्ती महापालिकेतून गायब झाल्याचे २०१२ मध्ये निदर्शनास आले होते. त्या वेळी मुंबई पालिका सभागृह, स्थायी, सुधार समिती बैठकांमध्ये या प्रश्नावरून नगरसेवकांनी गोंधळ घातला होता. तसेच प्रशासनावर ताशेरेही ओढले होते.

दरम्यान, किती नस्ती गहाळ झाल्या, किती नस्ती पुनर्स्थापित करण्यात आल्या, या प्रकरणी पोलिसांत दाखल झालेल्या गुन्ह्याची प्रत आदी माहिती मिळविण्यासाठी



माहितीचा अधिकार कार्यकर्ते सागर उगले यांनी माहिती अधिकारात पालिकेकडे अर्ज केला होता. गोरेगाव, मालाड, कांदिवली, बोरिवली, दहिसर परिसरांतील इमारतींच्या गहाळ झालेल्या १,४०१ नस्तींची सविस्तर यादी, तसेच पालिकेने कांदिवली येथील समतानगर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याबाबत १० मे २०१३ रोजी पाठवलेले पत्र उगले यांना अर्जावरील उत्तरादाखल देण्यात आले. या संदर्भात विकास नियोजन विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्याने बहुतांश नस्तींची पुनर्स्थापना झाल्याचे सांगितले. मात्र कागदपत्रे उपलब्ध नसल्याबाबत ते निरुत्तर होत या संदर्भात कानावर हात ठेवले.

नस्ती गहाळ झालेल्या इमारतींचा पुनर्विकास झाला आहे का, त्यांना निवासी दाखला मिळाला आहे का, पुनर्विकास झाला नसेल तर या इमारतींची आजघडीला स्थिती काय, त्या धोकादायक बनल्या आहेत का, इमारती धोकादायक बनल्या असतील आणि त्यांच्या नस्ती अद्याप पुनर्स्थापित झाल्या नसतील तर त्यांचा पुनर्विकास कसा होणार, अशा इमारतींबाबत महापालिकेने काय धोरण आखले आहे का, असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. पालिकेकडून मिळालेल्या माहितीवरून गहाळ झालेल्या नस्ती पुनर्स्थापित झाल्या की नाही याचा उलगडा होत नाही.

# डोंगर उतारावर राहणाऱ्यांनी सुरक्षितस्थळी स्थलांतरित व्हावे, मुंबई महानगरपालिका प्रशासनाचे आवाहन

**■ मुंबई: सम्यक कासारे**

पावसाळ्यात दरडी कोसळण्याची शक्यता, डोंगरावरून वाहत येणारा पाण्याचा लोंढा, आदींमुळे भूस्खलन होण्याचा धोका लक्षात घेऊन विक्रोळी पार्कसाईट, विक्रोळी (पश्चिम) आणि घाटकोपर (पश्चिम) भागातील वर्षानगर, रामनगर, संजय गांधी नगर, राहुल नगर, गणेश नगर, खंडोबा टेकडी, आझाद नगर, सोनिया गांधी नगर, प्रेम नगर व आनंद नगर या ठिकाणी डोंगराळ परिसरातील झोपडपट्टीवासियांनी सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे, असे आवाहन मुंबई



महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. दरम्यान, स्थलांतर न करता तेथेच वास्तव्य करणाऱ्या रहिवाशांची जबाबदारी त्यांची स्वत:ची असेल. नैसर्गिक आपत्तीने कोणत्याही प्रकारची दुर्घटना अथवा जीवित अथवा वित्तहानी झाल्यास महानगरपालिका प्रशासन त्यास जबाबदार राहणार नाही, असे एन विभागाचे सहायक आयुक्तांनी स्पष्ट केले आहे. पावसाळ्यादरम्यान दरडी कोसळण्याची, डोंगरावरून वाहत येणाऱ्या पाण्याच्या प्रवाहामुळे भूस्खलन होऊन घरांची पडझड होण्याची, तसेच नाल्यांना पूर येण्याची शक्यता असल्यामुळे झोपड्या वाहून जाण्याच्या संभाव्य घटना घडू शकतात.

# जीर्ण इमारती, दरडप्रवण क्षेत्रांची पाहणी; आपत्कालीन व्यवस्थापन कक्षाच्या समन्वयाने वांद्रे, अंधेरी, व मालाडमध्ये पाहणी

**■ मुंबई: प्रथमेश चव्हाण**

पावसाळयात जीर्ण इमारती, दरडप्रवण क्षेत्र आणि सखलभागात पाणी साचून आपत्कालीन स्थिती निर्माण झाल्यास सर्व संबंधित आपत्कालीन यंत्रणांनी सज्ज रहावे, बचाव आणि मदत कार्य पोहोचवताना परस्परांमध्ये समन्वय राखावा, या अनुषंगाने महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन कक्षाने पुढाकार घेतला आहे. दोन दिवस संबंधित यंत्रणांना एकत्र आणून विविध ठिकाणांची पाहणी करण्यात येत आहे. शुक्रवारी मुंबईतील १०५ पैकी काही ठिकाणांची पाहणी करण्यात आली. उर्वरित ठिकाणांची शनिवारी पाहणी करण्यात येणार आहे.

भारतीय लष्कर (आर्मी), भारतीय नौदल (नेव्ही), राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन दलाचे (एनडीआरएफ) जवान, महानगरपालिका आपत्कालीन व्यवस्थापन विभाग, मुंबई अग्निशमन दल, महानगरपालिका विभाग



कार्यालय आदींचे अधिकारी आणि कर्मचारी या पाहणीत सहभागी झाले होते. पावसाळ्यात संभाव्य आपत्ती उद्भवल्यास आव्हानात्मक ठिकाणी मदतकार्य पोहचविण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना करता येतील, आपत्तीत अडकलेल्या नागरिकांची सुखरूप आणि तात्काळ सुटका कशी करता येईल, हा पाहणी करण्यामागचा मुख्य उद्देश आहे. मुंबईतील पावसाळापूर्व तयारीसंदर्भात गेल्या आठवड्यात २३ मे रोजी महानगरपालिकेत सर्व यंत्रणांची बैठक झाली होती. त्यानुसार महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. सुधाकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन कक्षामार्फत विविध यंत्रणांशी पावसाळापूर्व तयारीसाठी समन्वय राखला जात असल्याची माहिती महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन विभागाचे संचालक महेश नार्वेकर यांनी दिली.

# अभ्यासक्रमात मनुस्मृतीच्या श्लोकांचा प्रस्ताव नाही; उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्पष्टीकरण

**■ मुंबई: यश सावंत**

आम्ही निवडणुकीपुरते हिंदू नसून रामसेवक आहोत, असे परखड प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर प्रदेशातील वाराणसी आणि अयोध्या दौऱ्यात केले. शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीचे श्लोक समाविष्ट करण्याचा कोणताही विचार किंवा प्रस्ताव नसून विरोधकांकडून अपप्रचार केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी खोटेपणा करून महाड येथे केलेल्या आंदोलनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र फाडून अवमान केला आहे. त्यांचा निषेध करीत महाराष्ट्र हा अवमान सहन करणार नाही,



असे फडणवीस यांनी नमूद केले. फडणवीस यांनी वाराणसीला जाऊन काशीविश्वेश्वराचे आणि अयोध्येला जाऊन प्रभू श्रीरामांचे दर्शन घेतले. मी राममंदिरासाठीच्या कारसेवेसाठी तीन वेळा आलो होतो. भव्य राममंदिर उभारणीनंतर अयोध्येला जाऊन दर्शन घेण्याची इच्छा होती. ती आज पूर्ण झाली, असे फडणवीस यांनी नमूद केले.

# आरे दूध वसाहतीत कॉंक्रीट रस्त्यांच्या खोदकामामुळे वाहतुकीला अडथळा

**■ मुंबई: विशाल कारंडे**

काही महिन्यांपूर्वी आरे दूध वसाहतीतील कॉंक्रीटीकरण करण्यात आलेल्या रस्त्यांवर पुन्हा खोदकाम करण्यात आले आहे. रस्त्यांच्या मधोमध उभ्या रेषेत खोदकाम केल्यामुळे वाहतुकीला अडथळे निर्माण होत आहे. तसेच, प्रवासादरम्यान रहिवाशांचा सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. नव्याने बांधण्यात आलेल्या रस्त्याची काही महिन्यातच प्रशासनानेत दुरवस्था केल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी पसरली असून पालिकेच्या खड्डेमुक्त रस्त्यांच्या उद्दिष्टावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मुंबईकरांना रुंद, खड्डेमुक्त आणि दर्जेदार रस्त्यांच्या माध्यमातून वेगवान प्रवासाची अनुभूती मिळावी, यासाठी पालिका प्रशासनाने मुंबईतील संपूर्ण रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, युद्धपातळीवर हे काम केले जात आहे. पावसाळ्यात कुठलाही अनुचित प्रकार घडू



नये, यासाठी रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे आदेश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी नुकतेच यंत्रणांना दिले आहेत. गेल्या काही महिन्यांपूर्वी आरे दूध वसाहतीमधील रस्त्यांचे कॉंक्रिटीकरणा झाल्यामुळे संबंधित भागातील रहिवाशांना दिलासा मिळाला होता. मात्र, पुन्हा कॉंक्रिटीकरण झालेल्या रस्त्यांवर खोदकाम करण्यात आल्यामुळे रहिवासी संतप्त झाले आहेत. काशीमिरा परिसरातील आरे पोलीस ठाणे आणि गोरेगावकडे जाणाऱ्या शेवटच्या टप्प्यावर खोदकाम करण्यात आले आहे. तसेच, अनेक ठिकाणी रस्त्यावर तडे गेल्याचाही आरोप रहिवासी करीत आहेत. त्यामुळे कॉंक्रिटीकरण प्रक्रियेच्या दर्जाबाबतही संशय व्यक्त केला जात आहे. कॉंक्रीट रस्त्यांचे पुन्हा खोदकाम करून नागरिकांच्या पैशांचा अपव्यय करण्यात येत आहे. तसेच, खोदकाम करण्यापूर्वी नागरिकांना विश्वासात घ्यायला हवे. खोदकामाचे कारण स्पष्ट करून लवकरच रस्त्याची दुरुस्ती करावी.

# नवी मुंबई विमानतळ प्रभाव परिसरातील बेकायदा महाकाय फलक चार आठवड्यांत हटवा, उच्च न्यायालयाचे जाहिरात कंपन्यांना आदेश

■ नवी मुंबई: धनश्री सट्टा

नवी मुंबई विमानतळ प्रभाव क्षेत्रातील (नैना) बेकायदा महाकाय फलक जाहिरात कंपन्यांना हटवावेच लागणार आहेत. या फलकांवर कारवाई करण्यापासून कोणताही अंतरिम दिलासा देण्यास उच्च न्यायालयाने गुरूवारी नकार दिला. तसेच, चार आठवड्यांच्या आत महाकाय फलक हटवण्याचे आदेश दिले. त्यानंतरही फलक हटवण्यात आले नाहीत, तर त्यावर कारवाई करण्याचे स्वातंत्र्य सिडकोला असेल, असेही न्यायालयाने प्रामुख्याने स्पष्ट केले.

या परिसरात फलक लावायचे असल्यास कंपन्यांनी परवानगीसाठी नव्याने अर्ज करावेत, असेही न्यायमूर्ती नितीन बोरकर आणि न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरेसन यांच्या सुट्टीकालीन खंडपीठाने स्पष्ट केले. तसेच, याचिकाकर्त्यांनी नैना परिसरात फलक लावण्यासाठी परवानगी मागणारा अर्ज सिडकोकडे केल्यास कायद्यानुसार त्यावर लवकरात लवकर म्हणजेच ४५ दिवसांत निर्णय घ्यावा, असे आदेश न्यायालयाने सिडकोला दिले. घाटकोपर येथील दुर्घटनेनंतर नैना परिसरातील बेकायदा फलक हटवण्याबाबत सिडकोने जाहिरात कंपन्यांना नोटिसा बजावल्या होत्या. या नोटिशीला जाहिरात कंपन्यांनी उच्च न्यायालयात



आव्हान दिले होते. न्यायालयानेही प्रकरणाची दखल घेताना बेकायदेशीर फलकांबाबत माहीत असूनही त्यावर कारवाई केली नाही. परंतु, घाटकोपर दुर्घटनेनंतर हे फलक आता तुमच्या नजरेस पडत आहेत आणि त्यावरील कारवाईबाबत तुम्हाला जाग आली आहे, अशा शब्दांत सिडकोला खडेबोल सुनावले होते. त्याचवेळी, सरसकट सगळ्याच फलकांवर कारवाई करण्याऐवजी बेकायदा फलक हटवण्यासाठी योग्य धोरण आखण्याचे आदेश न्यायालयाने सिडकोला दिले होते. नैना परिसरातील फलकांसाठी परवानगी देण्याचा सिडकोला अधिकार आहे का, अशी विचारणाही न्यायालयाने केली होती व त्याबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले होते. या पार्श्वभूमीवर, गुरूवारी या प्रकरणी सुनावणी झाली. त्यावेळी, २०१३ पासून सिडको नैना परिसराचे नियोजन प्राधिकरण म्हणून कार्यरत आहे. तसेच, सिडकोतर्फे विकास नियंत्रण नियमावलीचे (डीसीआर) पालन केले जाते व विकास नियंत्रण नियमावलीच्या ३० मध्ये नैना परिसरातील फलकांचा समावेश असल्याचे सिडकोच्या वतीने जी. एस. हेगडे यांनी न्यायालयाला सांगितले. या नियमानुसार, ५० मीटर रूंद रस्ता असल्यास किंवा राष्ट्रीय महामार्ग असल्यास, फलकाची कमाल उंची तीन मीटर आणि रूंदी १० मीटर अनिवार्य करण्यात आली आहे. तसेच, ही उंची जमिनीपासून फलकाच्या वरपर्यंत नऊ मीटर असायला हवी हेही नियमात स्पष्ट करण्यात आले आहे. असे असताना याचिकाकर्त्यांनी लावलेले फलक हे ४० बाय ४० फूट किंवा ४० बाय ५० फूट असल्याचे म्हणजे अनिवार्य करण्यात आलेल्या आकारापेक्षा कैकपटीने मोठे असल्याचे हेगडे यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

## शिळफाटा रस्त्यावरील मेट्रोची दिखाव्याची कामे बंद करा, मनसे आमदार राजू पाटील यांची 'एमएमआरडीए'वर टीका

■ कल्याण: विशेष प्रतिनिधी

शिवसेना-भाजपवर विकास कामांच्या माध्यमातून नेहमीच टिकेची झोड उठविणारे मनसेचे कल्याण ग्रामीणचे आमदार प्रमोद उर्फ राजू पाटील यांनी महायुतीचा धर्म बाजुला ठेऊन लोकांच्या समस्येची बाजू घेऊन ट्विटरच्या (एक्स) माध्यमातून पुन्हा शासनावर टीका करण्यास



सुरूवात केली आहे. शिवसेना-भाजप युतीत सहभागी व्हायचे असल्याने मागील तीन महिन्यांपासून गप्प असलेल्या आमदार पाटील यांनी लोकसभा निवडणुका पार पडताच, पुन्हा राज्य सत्ताधाऱ्यांचे डोळे उघडण्यास सुरुवात केली आहे. अनेक वर्षाचे कल्याण-शिळफाटा रस्त्यावरील वाहतूक कोंडीचे दुखणे या रस्त्याचे रुंदीकरण आणि काँक्रीटीकरणामुळे दूर झाले आहे. गेल्या दोन वर्षापासून या रस्त्यावरून समाधानाने सुसाट प्रवास करत आहेत. हा समाधानाचा श्वास घेत असताना आता कल्याण-शिळफाटा या सर्वाधिक वर्दळीच्या रस्त्यावर कल्याण-तळोजा मेट्रोचे काम सुरू करण्यात आले आहे. हे काम करताना मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाने शिळफाटा रस्त्याचे नवेकोरे काँक्रीट रस्ते, दुभाजक फोडून तेथे अतिभव्य अवजड यंत्रणा खोदकामासाठी आणून ठेवली आहे. त्यामुळे या यंत्रणेमुळे आत्ताच सोनारपाडा, गोळवली भागात वाहन कोंडीला सुरूवात झाली आहे, अशी माहिती आमदार पाटील यांनी 'एक्स'च्या माध्यमातून दिली आहे. कल्याण-तळोजा मेट्रो रस्ते कामासाठी भूसंपादन पूर्ण झाले आहे. त्यामुळे ज्याठिकाणी मोकळा भूभाग आहे. जेथे वाहन कोंडी होणार नाही अशा ठिकाणी पहिले मेट्रोचे खड्डे आणि इतर कामे सुरू करावीत. जेणेकरून लोकांना त्रास आणि कोंडीत लोकांना अडकावे लागणार नाही. याचा कोणताही विचार न करता शिळफाटा रस्त्यावर डोंबिवलीकरांना दिसेल अशा सोनारपाडा, गोळवली या वर्दळीच्या ठिकाणी अवजड यंत्रणेतून शिळफाटा रस्त्यावर खड्डे मारण्याची कामे एमएमआरडीएने सुरू केली आहेत.

## कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील इंग्रजी माध्यमाच्या शाळा अनधिकृत

■ कल्याण: आकाश कांबळे

शासनाची परवानगी न घेता सुरू करण्यात आलेल्या कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील तीन शाळा अनधिकृत म्हणून पालिकेच्या शिक्षण विभागाने घोषित केल्या आहेत. या तीन शाळा टिटवाळा भागात आहेत. या शाळा इंग्रजी माध्यमाच्या आहेत. मागील वर्षी अशाप्रकारच्या अनधिकृत शाळांची संख्या सहा होती. त्या शाळांनी शासनाच्या अटीशर्ती पूर्ण केल्याने त्या शाळांना परवानगी मिळाली आहे. अनधिकृत म्हणून घोषित केलेल्या शाळांमध्ये येत्या जूनमधील नवीन शैक्षणिक वर्षापासून आपल्या मुलासाठी प्रवेश घेऊ नयेत, असे आवाहन पालिकेच्या शिक्षण विभागाचे उपायुक्त धर्येशील जाधव यांनी केले आहे. एम. जी. टी. एलिमेंटरी स्कूल, सांगोडा रोड, स्मशानभूमीजवळ, मांडा-टिटवाळा,




संकल्प इंग्रजी स्कूल, बल्याणी, टिटवाळा, ऑक्सफर्ड इंग्लिश स्कूल, डोंगरवाली माता मंदिर, बल्याणी टेकडी, टिटवाळा पूव. 'अशी अनधिकृत शाळांची नावे आहेत. या शाळेत यापूर्वी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे जवळच्या शाळेत समायोजन केले जाईल. तसेच, या शाळांवर दंडात्मक कारवाईचा इशारा उपायुक्त जाधव यांनी दिला आहे. अलीकडे मुलांना इंग्रजी शाळेत टाकण्याची मोठी स्पर्धा पालकांमध्ये सुरू झाली आहे. त्यामुळे इंग्रजी शाळेत प्रवेश घेण्याच्या आशेने आपल्या घराजवळच्या इंग्रजी शाळेत मुलांना दामदुप्पट शुल्क भरून, देणगी घेऊन प्रवेश घेतात. या शाळा शासन परवानगीने सुरू आहेत का. येथील शिक्षक वर्ग कोण आहे याची कोणतीही माहिती पालक घेत नाहीत. पालकांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन शाळा चालक या नियमबाह्य शाळा चालवितात, असे शिक्षण विभागातील एका अधिकाऱ्याने सांगितले.

## आपत्तीवर मात करण्यासाठी सिडकोचे आपत्कालिन कक्ष सज्ज

■ पनवेल: भावना जैन

अतिवृष्टीमध्ये उद्भवलेल्या आपत्तीवर मात करण्यासाठी सिडको महामंडळाने सालाबादाप्रमाणे नागरिकांच्या मदतीसाठी आपत्कालीन नियंत्रण कक्ष सुरू केले आहे. जून ते सप्टेंबर या महिन्यामध्ये २४ तास या नियंत्रण कक्षातून रहिवाशांना मदत केली जाणार असल्याचे सिडको मंडळाच्या जनसंपर्क विभागाने मंडळाने दिलेल्या माहितीनुसार कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांसोबत शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही २४ तास हे कक्ष कार्यरत असणार आहे. या कक्षामार्फत आपत्कालीन स्थितीत अभियांत्रिकी विभाग, आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग, सुरक्षा विभाग, उद्यान विभाग व इतर महत्त्वाच्या विभागाचे कर्मचारी २४ तास




प्रसिद्धी पत्रकातून कळविले आहे. या प्रसिद्धीपत्रकात सिडको महामंडळाने पनवेल महापालिका क्षेत्रातील खारघर, कळंबोली, नवीन पनवेल, नावडे, काळुंद्रे, तळोजा, कामोठे या वसाहतींचे हस्तांतरण झाल्याने या वसाहतींना वगळून इतर सिडको वसाहतीमधील नागरिकांसाठी सिडकोचे हे आपत्कालीन नियंत्रण कक्ष मदत करेल असेही स्पष्ट केले आहे.

सीबीडी बेलापूर येथील सिडको भवन या इमारतीच्या तळ मजल्यावरुन आपत्कालिन नियंत्रण कक्षाचे काम सुरू असणार आहे. सिडको रहिवाशांच्या संपर्कात असतील.

आपत्कालीन कक्षाची कार्यपद्धती वृक्षांची पडझड होऊन वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या वृक्षांची छाटणी करण्यासाठी, रस्त्यावरील उघड्या गटारांची झाकणे पूर्ववत बसवणे, पूरसदृश परिस्थिती, रस्त्यांवरील खड्डे, रस्ते व नाल्याजवळ साचलेला कचरा, अतिवृष्टीमध्ये जलप्रवाहात नागरीकांची बुडण्याच्या ठिकाणी तसेच आगीची घटना घडल्यास, साथीचे रोग, इमारत कोसळणे, भूस्खलन, पाणी साचणे या आपत्तींची दखल हे पथक तातडीने घेईल.

## ठाण्यात अवैध व्यवसायांना आश्रय देणाऱ्या पोलिसांवर होणार कारवाई; बेकायदा पब, हुक्का पार्लर, डान्स बारवर कारवाईसाठी स्वतंत्र कक्ष

■ ठाणे: तृप्ती गोरे

पुणे येथील पोर्शे अपघाताप्रकरणानंतर जाग आलेल्या ठाणे उत्पादन शुल्क विभागाने जिल्ह्यात बेकायदा सुरू असलेल्या ११ हॉटेल आणि बारचे परवाने निलंबित केले असतानाच, त्यापाठोपाठ आता ठाणे पोलिसांनी बेकायदा पब, हुक्का पार्लर आणि डान्स बारवर कारवाईसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन केला आहे. तसेच अशा अवैध व्यवसायांना आश्रय देणाऱ्या स्थानिक पोलिसांवर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा ठाण्याचे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी दिला आहे. ठाण्यातील बेकायदा हॉटेल, पब, हुक्का पार्लर आणि डान्स बारवर कारवाई व्हावी अशी मागणी भाजपचे आमदार संजय केळकर



यांनी यापुर्वीच ठाणे पोलिसांकडे केली होती. परंतु त्यावर अपेक्षित कारवाई होत नसल्याबद्दल केळकर यांनी नाराजी व्यक्त केली होती. पुणे येथील पोर्शे अपघाताप्रकरणानंतर ठाण्यातील बेकायदा हॉटेल, पब, हुक्का पार्लर आणि डान्स बारचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर आमदार केळकर यांनी ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांची भेट घेऊन अशा व्यवसायांवर ठोस कारवाई करण्याची मागणी केली.

गेल्या अडीच ते तीन वर्षापासून ठाण्यातील तरुण पिढ्यांना उद्ध्वस्त करणाऱ्या बेकायदेशीर डान्स बार, पब आणि हुक्का पार्लर या अवैध व्यवसायांविरुद्ध महापालिका आणि पोलीस प्रशासनाकडे पाठपुरावा करीत असून यासंदर्भात लोक चळवळही सुरू केली. यावर अधिवेशनातही आवाज उठवला. यानंतर ठाण्यातील या अवैध व्यवसायांवर कारवाई झाली. पण, त्यांनतर पुन्हा हे व्यवसाय सुरू होत असल्याची बाब आमदार केळकर यांनी आयुक्त डुंबरे यांच्या निदर्शनास आणून दिली. तसेच या अशा व्यवसायांवर ठोस कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली.

अवैध व्यवसायांवर नियमित आणि ठोस कारवाई करण्यासाठी स्वतंत्र कक्ष सुरू करण्यात आला असल्याची माहिती आयुक्त डुंबरे यांनी यावेळी दिली.

## जड-अवजड वाहनांमुळे घोडबंदर मार्गावर कोंडी, एक किलोमीटर अंतर गाठण्यासाठी दोन तास

■ ठाणे: तृप्ती गोरे

ठाणे आणि मुंबई अहमदबाद मार्गांना जोडणाऱ्या घोडबंदर मार्गिकेच्या दुरुस्तीचे काम मागील काही दिवसांपासून सुरू आहे. या मार्गावर जड अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली असली तरीही सर्रास जड-अवजड वाहनांची वाहतूक होऊ लागली आहे. त्याचा परिणाम येथील



वाहतूक व्यवस्थेवर झाला असून अवघ्या एक किलोमीटरचे अंतर गाठण्यासाठी वाहन चालकांना दोन किंवा त्याहून अधिक तास लागत आहेत. त्यामुळे चालकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. अवजड वाहनांना बंदी असतानाही प्रवेश कसा दिला जातो असा प्रश्न वाहन चालक विचारत आहेत. घोडबंदर मार्गावर पावसाळ्यात खड्डे पडत असतात. त्यामुळे येथील घाट रस्त्याच्या तात्पुरत्या स्वरुपात डागडुजीची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून केली जात आहे. घोडबंदर मार्ग हा ठाणे तसेच मुंबई अहमदाबाद मार्गाला जोडतो. उरण येथील जेएनपीटी येथून जाणारी हजारो अवजड वाहने घोडबंदर मार्गे वसई किंवा गुजरातच्या दिशेने ये-जा करत असतात. राज्य परिवहन मंडळाच्या बसगाड्या (एसटी), महापालिका परिवहन विभागाच्या बसगाड्यांसह हलक्या वाहनांची वाहतूक येथून मोठ्याप्रमाणात होत असते.

## अभिनेता सलमान खानच्या जिवाला धोका कायम - नवी मुंबई पोलीस

■ पनवेल: सचिन कदम

अभिनेता सलमान खान याच्या हत्येचा कट रचणे आणि त्यासाठी पाकीस्तानी शस्त्र तस्कराची मदत घेतल्याप्रकरणी चौघा संशयीतांना पकडल्याची माहिती पत्रकार परिषदेत पनवेल येथे दिली. अद्याप सलमानच्या मारेकऱ्यांच्या टोळीतील २० हून अधिक संशयीत फरार असल्याने सलमान खानच्या जिवाचा धोका अद्याप टळला नसल्याची बाब पत्रकार घेऊन पोलीसांनी स्पष्ट केली. नवी मुंबई पोलीस दलाचे परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त विवेक पानसरे यांनी दिलेल्या माहितीनूसार पकडलेल्या संशयीतांकडे अनेक धक्कादायक माहिती समोर आली. सलमानच्या मुंबईतील बांद्रा येथील घरी आणि पनवेल येथील शेतघरावर या टोळीतील सदस्यांनी टेहळणी करुन त्याला मारण्यासाठी पाकीस्तान येथून शस्त्र खरेदी करण्याचा कट रचला होता. सलमानला घरावरील हल्ल्यानंतर राज्य सरकारने सलमानला विशेष सूरक्षा पुरविली आहे. त्याचसोबत तो ज्या ठिकाणी जातो तेथील स्थानिक पोलीस तेथे तैनात केले जातात. मागील वर्षी ऑक्टोबर महिन्यात पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक नितिन ठाकरे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती. त्यानंतर पोलीसांच्या पथकाने संशयीतांचे मोबाईल फोन टॅप करायला सूरु केले. पोलीसांना या फोन टॅपींगमध्ये महत्वाचे धागेदोरे हाती लागले. लॉरेंस बिश्णेई आणि गोल्डी ब्रार यांच्या टोळीसोबत थेट संपर्कात




असलेला २८ वर्षीय अजय कश्यप उर्फ धनंजय तपेसिंग हा मुख्य मध्यस्थी सापडला. गोल्डी हा कॅनडाहून टोळी चालवित असून पाकीस्तान येथील डोगर नावाचा शस्त्र तस्कराच्या संपर्कात हे सारेजण असल्याचे उघड झाले. अजय हा मागील अनेक महिन्यांपासून पनवेल येथील खिडुकपाडा गावात राहत होता. २० वेगवेगळ्या मोबाईल नंबरचे सीमकार्ड अजय वापरत असल्याचे पोलीसांच्या तपासाता उघड झाले. अजयने सलमानला मारल्यानंतर कन्याकुमारी मार्गे सर्वांनी श्रीलंकेत कसे जावे याचेही नियोजन केले होते. सलमानची हत्या हा एकमेव हेतू या सर्वांचा होता. सलमानच्या हत्येनंतर मोठी रक्कम या सा-यांना मिळणार होती. कायद्याचा ससेमीरा संशयीतांच्या मागे लागू नये यासाठी १८ वर्षाखालील वयाच्या मुलांकडून हत्या करण्याचा यांचा कट होता. अजयसोबत २९ वर्षीय गौरव भाटीया उर्फ संदीप बिष्णोई, ३६ वर्षीय वस्पी मोहम्मद उर्फ वसीम चिकना, झीशान झकरुल हसन उर्फ जावेद खान अशी पोलीसांनी अटक केलेल्या संशयीत आरोपींची नावे आहेत. पोलीस उपायुक्त पानसरे यांनी दिलेल्या माहितीनूसार अजयला पनवेलमधून, संदीपला गुजरात येथून, वस्पी याला छत्रपती संभाजीनगर येथून आणि जावेदला बंगळुरु कर्नाटक येथून पोलीसांच्या पथकाने ताब्यात घेतल्याचे उपायुक्त पानसरे म्हणाले. मागील वर्षी ऑक्टोबर महिन्यापासून ते आतापर्यत पनवेल शहर पोलीसांचे १० कर्मचारी व दोन पोलीस अधिकारी या महत्वाच्या प्रकरणाचा तपास लावत आहेत.

## एचडी बीच रिसॉर्ट मालकाविरोधात अखेर गुन्हा दाखल

■ वसई: दिगंबर जाधव

वसईतील एचडी रिसॉर्टमधील तरण तलावात झालेल्या चिमुकलीच्या मृत्यूप्रकरणी रिसॉर्ट मालकांचा हलगर्जीपणा असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्यामुळे रिसॉर्ट मालक रोमन डिमेलो याच्याविरोधात हलगर्जीपणा दाखवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी कलम ३०४(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुधवारी २९ मे रोजी वसईच्या रानगाव येथील एचडी बीच या रिसॉर्टमधील तरणतलावात बुडून समीक्षा जाधव (७) या चिमुकलीचा मृत्यू झाला होता. सकाळी भांडुप येथील महिलांचा एक गट या सहलीसाठी आला होता. त्यात समीक्षा आपल्या आजीसह आली होती. सकाळी ते रिसॉर्टमधील तरण तलावात उतरले होते. दुपारच्या



जेवणाच्या वेळी सर्व जण तरण तलावातून बाहेर आले आणि जेवणाच्या खोलीत गेले होते. त्यावेळी समीक्षा खेळत खेळत तरण तलावात उतरली. मात्र त्यावेळी कुणी जीवरक्षक नसल्याने समीक्षा पाण्यात बुडून मरण पावली होती. या प्रकरणी पोलिसांनी केलेल्या तपासात रिसॉर्टचालकांचा हलर्गजीपणा दिसून आला. या रिसॉर्टमधे ३ जीवरक्षक होते. जेवणाच्या वेळी पर्यटक तरणतलावातून बाहेर निघाल्यानंतर जीवरक्षक निघून गेले होते. तरणतलाव त्यांनी झाकून बंद केला नव्हता. तसेच तेथे जीवरक्षक तैनात नव्हता. त्यामुळे समीक्षा पाण्यात गेली तेव्हा कुणाचे लक्ष नव्हते. मात्र ती बुडू लागताच लांबून एका जीवरक्षकाने पाहिले. परंतु मुलगी पाण्यात खेळत आहे, असा त्याचा समज झाला. परंतु ती बुडायला लागली तेव्हा तो पाण्यात तिला वाचवायला गेला.

## अनैतिक संबंधातून महिलेची हत्याः मतदार यादीवरून पटली ओळख, स्प्रेवरून लावला छडा

■ विरार: गणेश बागडे

नालासोपारा येथील धानिव बाग येथे सापडलेल्या अज्ञात महिलेच्या हत्येचा छडा पेल्हार पोलिसांनी लावला आहे. सायराबानू शाह असे या महिलेचे नाव असून अनैतिक संबंधातून ही हत्या झाल्याचे तपासात उघडझाले आहे

मंगळवार २८ मे रोजी नालासोपारा पूर्वेच्या धानिवबाग येथील डोंगराखाली असलेल्या ओव्हळात एका महिलेचा मृतदेह आढळला होता. तिची धारदार शस्त्राने गळा कापून हत्या करण्यात आली होती. मात्र तिची ओळख पटत नव्हती. या प्रकरणी पेल्हार पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने मयत महिलेच्या पतीचा भाचा नजाबुद्दीन सम्मी (२१) याला दिल्ली येथून अटक केली आहे. मयत महिला सायराबानू शाह (३४) असे या मयत महिलेचे नाव आहे. पोलिसांना महिलेची ओळख पटविणे आणि मारेकरी शोधणे अशा दोन्ही कसोट्यांवर काम करण्याचे आव्हान होते. पोलिसांना मृतदेहाजवळ एक वापरलेले कॉण्डम आणि एक स्प्रे आढळून आला. तोच दुवा पकडून गुन्हे प्रकटीकरण शाखेने तपास केला. त्या स्प्रेवर असलेल्या बॅच वरून पोलिसांनी परिसराती सर्व मेडिकल दुकानात तपास सुरू केला. त्यावेळी एक अनोळखी तरून शुक्रवार २४ मे रोजी हा स्प्रे घेऊन गेल्याची माहिती मिळाली. परंतु तो तरूण कोण होता त्याचा उलगडा होत नव्हता. दरम्यान, महिलेची ओळख पटविण्यासाठी



पोलिसांनी तिच्या पोशाखावरून ती मुस्लिम असल्याचा तर्क लावला. त्यावरून परिसरातील मतदार याद्यांमधील मुस्लिम महिलांची नावे तपासली आणि त्यावरून शोध घेण्यास सुरवात केली. धानिवबाग येथील एका घरात जियाउल शहा याच्या घरात मयत महिलेचा फोटो घेऊन विचारपूस करण्यासाठी गेले. तेव्हा मयत महिला जियाउल याची पत्नी असल्याचे समजले. ती मागील ३ दिवसांपासून बेपत्ता असल्याचे त्याने सांगितले. पोलिसांनी त्याला मेडिकल दुकानातून त्या तरूणाचे सीसीटीव्ही चित्रण दाखवले. तेव्हा तो तरूण जियाऊल याचा भाचा असून दिल्लीत गेल्याची माहिती दिली. आरोपी नजाबुद्दीन हा दिल्लीत पळून गेल्याची माहिती मिळाली. पोलिसांचे एक पथक तात्काळ दिल्लीला रवाना झाले. तो एका बेकरीत काम करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

# 'संजय राऊत ज्या शाळेत शिकले, ती शाळा...'; नाना पटोलेंचा खोचक टोला, म्हणाले, 'तुम्ही शंभर टक्के...'

■ मुंबई: सम्यक कासारे

देशात लोकसभा निवडणूक पार पडली असून ४ जून रोजी या निवडणुकीचा निकाल लागणार आहे. मात्र, निकालाच्या आधी १ जून रोजी एक्झिट पोल समोर आले आहेत. या एक्झिट पोलच्या अंदाजानुसार, पुन्हा एकदा एनडीएचं सरकार सत्तेत येईल, असा अंदाज वर्तवला जात आहे. एनडीएने ३५० चा आकडा पार करेल असं एक्झिट पोलमध्ये सांगण्यात आलं आहे. एक्झिट पोलनंतर राजकीय नेते वेगवेगळ्या प्रतिक्रिया देत आहेत. एकीकडे भाजपा पुन्हा सत्ता स्थापनेचा दावा करत आहे, तर दुसरीकडे इंडिया आघाडी सत्ता स्थापन करेल, असा दावा विरोधी पक्षातील नेते करत आहेत. यावर आज ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया देत विविध घडामोडींवर भाष्य केलं.

सांगली लोकसभेच्या जागेसंदर्भात एक्झिट पोलमध्ये विशाल पाटील हे जिंकतील, अशी शक्यता वर्तवण्यात आली. यावर बोलताना संजय राऊतांनी यावर नंतर बोलणार आहे. आम्हाला प्रत्येक गोष्ट माहिती आहेत. आम्ही काय गोट्या खेळत नाही. आमचं आयुष्य सुद्धा राजकारण, समाजकारणात गेलं आहे, असा अप्रत्यक्ष इशारा राऊतांनी काँग्रेसला दिला. त्यानंतर आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राऊतांवर खोचक टीका केली. 'संजय राऊत ज्या शाळेत शिकले ती शाळा काँग्रेसने निर्माण केली', असा टोला पटोले यांनी लगावला. 'कोणीही गोट्या खेळायला येथे बसलेलं नाही. सगळेजण राजकारण करायला आलेले आहेत. तुम्ही शंभर टक्के राजकारण करत असताल, पण आम्ही ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण करत आहोत. त्यामुळे संजय राऊत यांच्याबाबत मी जास्त वक्तव्य करणार नाही', असं पटोले यांनी म्हटलं. आजच्या रोखठोकमध्ये राऊत यांनी असं म्हटलं की, ७० वर्षात लोकशाहीचा कचरा केला, त्यांच्या या विधानावर तुमची प्रतिक्रिया काय? यावर नाना पटोल म्हणाले, 'संजय राऊत ज्या शाळेत शिकले ती शाळा काँग्रेसने निर्माण केली होती. त्यांच्या गावात पिण्याचे पाणी, रुग्णालय काँग्रेसने निर्माण केलं होतं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं संविधान टिकवण्याचं काम काँग्रेसने केलं आहे. मी संजय राऊत याच्याबाबत काय प्रतिक्रिया द्यावी? ते अतिविद्वान आहेत. कालच ते लंडनवरून आले आहेत. तिकडून अजून काय जास्त शिकून आले ते मला माहिती नाही. त्यांच्यावर तिकडच्या थंडीचा असर झाला आहे की देशातील उष्णतेचा असर झाला हे मला माहिती नाही', अशा खोचक शब्दांत नाना पटोले यांनी संजय राऊतांच्या विधानाला प्रत्युत्तर दिलं.





# आमदार रवी राणांचा उद्धव ठाकरेंबाबत मोठा दावा; म्हणाले, 'मोदी पुन्हा सत्तेत आल्यावर १५ दिवसांत...'

■ मुंबई: संजीनी खाडे

देशात लोकसभा निवडणुका पार पडल्या आहेत. आता ४ जून रोजी या निवडणुकीचा निकाल लागणार आहे. त्याआधी १ जून रोजी एक्झिट पोलचा अंदाज समोर आला आहे. या एक्झिट पोलच्या अंदाजानुसार, देशात पुन्हा एकदा एनडीएचं सरकार येणार असल्याची शक्यता आहे. भाजपाप्रणित एनडीएने ३५० चा आकडा पार केल्याचं एक्झिट पोलच्या आकडेवारीत दिसत आहे. तर दुसरीकडे विरोधी पक्षाच्या काही नेत्यांनी देशात इंडिया आघाडीचं सरकार येणार असल्याचा दावा केला आहे. अशातच अपक्ष आमदार रवी राणा यांनी मोठं विधान केलं आहे.



'देशात पुन्हा एकदा नरेंद्र मोदी सत्तेत आल्यानंतर १५ दिवसांत उद्धव ठाकरे त्यांच्याबरोबर दिसतील', असं वक्तव्य रवी राणा यांनी केलं. 'मी आपल्याला सांगतो की, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत ज्या पद्धतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर बोलले आहेत. मात्र, आता मी जबाबदारीने सांगतो की, देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान म्हणून विराजमान झाल्यानंतर १५ दिवसांमध्ये उद्धव ठाकरे हे मोदी सरकारमध्ये असतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबर ते दिसतील. कारण येणारा काळ हा नरेंद्र मोदी यांचा आहे. देशाचं भविष्य उज्वल करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची गरज आहे', असं रवी राणा यांनी म्हटलं आहे. 'आमदार रवी राणा यांनी मोदी सत्तेत आल्यानंतर उद्धव ठाकरे १५ दिवसांत त्यांच्याबरोबर येतील, असा मोठा दावा केला. त्यावर आता शिवसेना शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांनी भाष्य केलं आहे. शिरसाट म्हणाले, 'या गोष्टी जर तरच्या आहेत. त्यांनी (उद्धव ठाकरे यांनी) यावं की नाही, हा त्यांचा वैयक्तिक निर्णय आहे. तसंच त्यांना घ्यावं की नाही हे ठरवणारे उद्धव ठाकरे नाही तर ते नरेंद्र मोदी, अमित शाह, एकनाथ शिंदे आहेत', अशी प्रतिक्रिया संजय शिरसाट यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी संजय शिरसाट यांना पडद्यामागे काही हालचाली सुरु आहेत का?, असा प्रश्न विचारला असता ते म्हणाले, 'आता पडद्यामागे हालचाली नाही तर आता पडदा बाजूला गेलेला आहे. आता हालचाली या समोर व्हायला लागल्या आहेत.

# जनऔषधी केंद्रांमध्ये कर्करोग, प्रतिजैविके आदींच्या विक्रीला औषध कंपन्यांचा विरोध

■ मुंबई: प्रथमेश चव्हाण

नागरिकांना सर्व प्रकारची औषधे स्वस्त दरात मिळावीत यासाठी केंद्र सरकारने देशभरात जनऔषधी केंद्रे सुरू केली असून या केंद्रांना नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. आता या केंद्रांवर कर्करोग, क्षयरोग, प्रतिजैविके, तसेच डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय न दिली जाणारी औषधे उपलब्ध करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. या निर्णयाला देशातील औषध कंपन्यांनी कडाडून विरोध केला आहे.

आजघडीला देशामध्ये १० हजार ६०० हून अधिक जनऔषधी केंद्रे सुरू आहेत. सर्वसामान्य नागरिकांना स्वस्त दरात औषधे मिळावी यासाठी या केंद्रांवर जेनेरिक औषधांची विक्री करण्यात येत आहे. केंद्रीय औषधे मानक नियंत्रण संस्थेने (सीडीएससीओ)



एच, एच १ आणि एक्स या शेड्यूलमधील औषधांची पर्यायी जेनेरिक औषधे उपलब्ध व्हावीत यासाठी औषध आणि सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० मध्ये बदल करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. शेड्यूल एचमध्ये सामान्य औषधांचा समावेश आहे, तर शेड्यूल एच १ मध्ये सेफिक्साईम, मोक्सीफ्लॉक्सासिन सारख्या तिसऱ्या आणि चौथ्या प्रकारातील प्रतिजैविकांचा, तसेच क्षयरोगविरोधी औषधे आणि काही मानसिक आरोग्यासंदर्भातील औषधांचा समावेश आहे. शेड्यूल एच १ मधील विक्री केलेल्या औषधांचा तपशिल तीन वर्षासाठी राखून ठेवावा लागतो. तसेच तपासणीसाठीही उपलब्ध करावा लागतो. त्याचप्रमाणे शेड्यूल एक्समधील औषधांची सवय लागण्याची शक्यता असते. त्यामुळे ती डॉक्टरांची चिठ्ठी असल्यास फार्मासिस्टद्वारेच दिली जातात. या औषधांच्या विक्रीचा तपशील दोन वर्षे राखून ठेवावा लागतो.

# अनैतिक संबंधातून सोसायटीच्या माजी अध्यक्षाची भरदिवसा हत्त्या

■ सांगली: यश सावंत

अनैतिक संबंधातून विकास सोसायटीच्या माजी अध्यक्षाचा रविवारी भरदिवसा चाकूने भोकसून खून करण्याचा प्रकार कोसारी (ता. जत) येथे घडला. या खूनप्रकरणी दोन भावाना पोलिसांनी रविवारी रात्री अटक केली. याबाबत पोलीस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार



कोसारी विकास सोसायटीचे माजी अध्यक्ष शंकर आप्पाणा तोरवे (वय ५६) यांचा रविवारी दुपारी अडीच वाजता चाकूने भोकसून व लोखंडी नलिकेने मारहाण करून खून करण्यात आला. या खूनप्रकरणी संदीप महादेव नरूटे, संतोष महादेव नरूटे या दोन भावांना अटक करण्यात आली आहे. मृत तोरवे याचा आणि संशयित आरोपींच्या नातलग महिलेचे अनैतिक संबंध असल्याचा राग होता. या रागातूनच हा खून करण्यात आल्याची प्राथमिक माहिती चौकशीतून समोर आली आहे. तशी तक्रार जत पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. दरम्यान, मुलीच्या प्रकरणात सतिश अर्जुन कुंभार (वय २४ रा. कवठेएकंद ता. तासगाव) याच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला. कुंभार याला कवठेएकंद हायस्कूलजवळ असलेल्या पोल्ट्रीमध्ये बोलावून मुलीच्या प्रकरणात दम देत असताना त्याच्यावर अभिजित गुजले उर्फ बाळशा आणि वैभव या दोघांनी चाकूने वार केले. या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# स्वच्छता मोहिमेत १५७ मेट्रिक टन राडारोडा व ७४ मेट्रिक टन कचऱ्याचे संकलन

■ मुंबई: सम्यक कासारे

**महानगरपालिकेच्या प्रशासकीय विभागांतील विविध ठिकाणी शनिवारी सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. त्यातून सुमारे १५७ मेट्रिक टन राडारोडा, २३ मेट्रिक टन टाकाऊ वस्तू आणि ७४ मेट्रिक टन कचऱ्याचे संकलन करण्यात आले. तसेच, जवळपास २८३ किलोमीटर लांबीचे रस्ते स्वच्छ करण्यात आले.**

मुंबईत गेल्या २८ आठवड्यांपासून सखोल स्वच्छता मोहीम सुरू आहे. दर शनिवारी प्रत्येक प्रशासकीय विभागात नियमितपणे स्वच्छता मोहीम राबविली जात आहे. या अंतर्गत शनिवारी सर्व प्रशासकीय विभागात लोकसहभागातून सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. त्यावेळी सुमारे १५७ मेट्रिक टन राडारोडा, २३ मेट्रिक टन टाकाऊ मोठ्या वस्तू आणि ७४ मेट्रिक टन कचऱ्याचे संकलन करण्यात आले. तसेच, सुमारे २८३ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांवर ब्रशिंग करून धूळ काढण्यात आली. जेसीबी, डंपर, कॉम्पॅक्टर, कचरा संकलन करणारी वाहने, पाण्याचे टँकर, फायरेक्स यंत्र, मिस्टींग यंत्र आणि अन्य अद्ययावत यंत्रणासह तब्बल १ हजार ३३२ कामगार व कर्मचाऱ्यांनी ही मोहीम पूर्ण केली.



पालिकेच्या ए विभागातील बोरा बाजार, सर फिरोजशाह मेहता मार्ग, पेरी नरिमन मार्ग, डी विभागात नाना चौक, ताडदेव सर्कल, जावजी दादाजी मार्ग, जी दक्षिण विभागात धोबीघाट, सुदाम काळू अहिरे मार्ग, जी उत्तर विभागात शाहूनगर, धारावी, एच पूर्व विभागात सांताक्रुज येथे इंडियन ऑईल कंपनी प्रवेशद्वार ते हनुमान टेकडी परिसर, के पूर्व विभागात प्रभाग ८३ मधील झोपडपट्टी व आसपासचा परिसर, के पश्चिम विभागात वेसावे येथील मत्स्य पालन विद्यापीठ मार्ग, सुंदरवाडी, एल विभागात साकीनाका येथील एस. जे. स्टुडिओ ते खैरानी मार्ग, एम पूर्व विभागात सोनापूर मार्ग, पी दक्षिण विभागात महात्मा गांधी मार्ग, स्वामी विवेकानंद मार्ग, पी उत्तर विभागात मालाड पश्चिम येथील जोड रस्ता, आर दक्षिण विभागात कांदिवली पूर्व येथे आकुर्ली मार्ग, आर उत्तर विभागात दहिसर पश्चिम, आर मध्य विभागात अमरकांत झा मार्ग, ब्रह्मा विष्णू महेश मार्ग, शिंपोली मार्ग, मल्हारराव कुलकर्णी मार्ग, टी विभागात मुलुंड आदी ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

# सोलापूरच्या लक्ष्मी मिलची १२५ वर्षांची जुनी चिमणी अखेर जमीनदोस्त

■ सोलापूर: संजीनी खाडे

सोलापूरच्या एकेकाळच्या गिरणगावाची निशाणी असलेली लक्ष्मी-विष्णू कापड गिरणीच्या लक्ष्मी युनिटची सुमारे १२५ वर्षांची जुनी ५० फूट उंच चिमणी धोकादायक ठरल्याने गुरुवारी अखेर जमीनदोस्त करण्यात आली. ही चिमणी पाडल्यामुळे या कापड गिरणीच्या बेकार कामगारांचे वारसदार आणि कुटुंबीयांसह आधुनिक सोलापूरचे इतिहासप्रेमी हळहळले.



मुंबईत औद्योगिक क्रांती झाल्यानंतर त्यापाठोपाठ १८७७ साली सोलापुरात, सोलापूर स्पिनिंग अँन्ड विव्हिंग मिल अर्थात जुनी कापड गिरणी उभारली गेली. त्यापाठोपाठ लक्ष्मी-विष्णूसह जामश्री मिल, नरसिंग गिरजी अर्थात वारद मिल अशा कापड गिरण्यांची उभारणी झाली होती. त्यामुळे सोलापूरची गिरणगाव या नावाने ओळख झाली होती. परंतु नंतर या कापड गिरण्या बंद पडल्या. ब्रिटीशकालीन लक्ष्मी-विष्णू कापड गिरणी १९६६ साली दिवंगत उद्योगपती, क्रिकेटपटू माधवराव आपटे यांनी विकत घेऊन चालविली घेतली असता १९९४ साली ही कापड गिरणी बंद पडली. कामगारांसह इतर कृणकोंचे देणे भागविण्यासाठी या कापड गिरणीची जमीन २००४ साली लिलालाद्वारे विकण्यात आली. निझामाबादच्या ट्रान्स एशियन कंपनीने ही जमीन खरेदी केली. नंतर अंतरिक्ष मल्टिकॉम प्रा. लि. कंपनीने ही जमीन ताब्यात घेतली. अलिकडे या जमिनीवर निवासी संकुले उभारण्यात आली आहे. लक्ष्मी मिलच्या जागेवर असलेली ५० मीटर उंच चिमणी अलिकडे धोकादायक स्थितीत होती. या चिमणीच्या बांधकामाची तज्ज्ञांकडून शास्त्रोक्त पद्धतीने तपासणी केली असता चिमणी नैऋत्य दिशेला तीन फूट कलल्याचे दिसून आले. दरम्यान, याबाबतचा अहवाल सोलापूर महापालिकेने विचारात घेऊन पुन्हा तपासणी केली. यात चिमणी धोकादायक स्थितीत असल्याचा निष्कर्ष काढून पालिका प्रशासनाने ही चिमणी पाडून टाकण्याबाबत नोटीस बजावली. त्यानुसार सुमारे १२५ वर्षांची चिमणी मुंबईतील एका ठेकेदारामार्फत जमीनदोस्त करण्यात आली. विष्णू मिलची चिमणीही यापूर्वी धोकादायक असल्याची सबब पुढे करून पाडण्यात येत होती. परंतु वारसा वास्तू जतन होण्यासाठी नागरिकांनी विरोध केल्यामुळे काळ्या दगडी बांधकामाची ही चिमणी वाचली आहे.

# परदेशात नोकरी देण्याचे अमिष दाखवून तरुणाला अडीच लाखाना गंडा

■ प्रतिनिधी: संजीनी खाडे

आखाती देशात नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत ट्रॉम्बेमधील एका तरुणाची पती-पत्नीने अडीच लाख रुपयांची फसवणूक केली. याबाबत तरुणाने ट्रॉम्बे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी यामध्ये गुन्हा दाखल करत तपास सुरू केला आहे.




ट्रॉम्बेतील चित्ता कॅम्प परिसरात सय्यद असगर (४७) हा पत्नीसह वास्तव्यास आहे. टॅक्सी चालवून घरखर्च भागत नसल्याने त्याने आखाती देशात नोकरी करण्याचे ठरवले. ही बाब त्याने शेजारी राहणाऱ्या एका महिलेला सांगितली. तिच्या ओळखीतली एक महिला आखाती देशात तरुणांना नोकरीसाठी पाठवत होती.

# गुजरात, कर्नाटकपेक्षाही महाराष्ट्रात सर्वाधिक थेट परकीय गुंतवणूक, फडणवीसांचा विरोधकांना टोला

■ मुंबई: नितीन देवळेकर

आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये देशातील थेट परकीय गुंतवणूक ३.५ टक्क्यांनी घसरली असली तरी राज्यपातळीवर गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. केंद्रीय औद्योगिक आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाने




(डीआयपीपीटी) गुरुवारी थेट परकीय गुंतवणुकीबाबतचा अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक्सवर पोस्ट टाकून विरोधकांना टोला लगावताना महाराष्ट्रातील गुंतवणुकीची माहिती दिली आहे. 'बोलायला नाही, कर्तृत्व दाखवायला हिंमत लागते', असा टोला विरोधकांना लगावत देवेंद्र फडणवीस यांनी ही माहिती दिली आहे. 'एफडीआय आकर्षित करण्यात महाराष्ट्र २०२२-२३ मध्ये प्रथम क्रमांकावर राहिल्यानंतर आता २०२३-२४ या आर्थिक वर्षात सुद्धा पहिल्या क्रमांकावर आला आहे. केंद्र सरकारच्या डीपीआयआयटीने काल ३० मे रोजी ही आकडेवारी जाहीर केली. या आकडेवारीनुसार, महाराष्ट्राने गेल्यावर्षीपेक्षा अधिक परकीय गुंतवणूक यावर्षी प्राप्त केली आहे', असे देवेंद्र फडणवीस यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये लिहिले आहे. '२०२२-२३ या आर्थिक वर्षात १,१८,४२२ कोटी तर २०२३-२४ या वर्षात १,२५,१०१ कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. या आर्थिक वर्षातील गुंतवणूक ही गुजरातमध्ये प्राप्त झालेल्या एकूण गुंतवणुकीपेक्षा दुपटीहून अधिक आहे, तर दुसऱ्या क्रमांकावरील गुजरात आणि तिसऱ्या क्रमांकावरील कर्नाटकच्या एकूण बेरजेपेक्षाही अधिक आहे. महाविकास आघाडीच्या काळात गुंतवणूक आकर्षित करण्यात पिछाडलेला महाराष्ट्र पुन्हा एकदा सलग दोन वर्ष पहिल्या क्रमांकावर आहे', असेही ते म्हणाले आहेत.

देशाबाबत बोलायचो झाल्यास जानेवारी ते मार्च २०२४ या अंतिम तिमाहीत दरम्यान विदेशी गुंतवणूक ३३.४ टक्क्यांनी वाढून १२.३८ अब्ज डॉलरवर पोहोचली, जी मागील वर्षीच्या याच कालावधीत ९.२८ अब्ज डॉलर होती. भांडवली बाजारातील विदेशी गुंतवणूकही २०२२-२३ मधील ७१.३५ अब्ज डॉलरवरून कमी होत, मार्च २०२४ अखेर ७०.९५ अब्ज डॉलरपर्यंत घटली आहे. आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये देशामध्ये आतापर्यंतचा सर्वाधिक ८४.८३ अब्ज डॉलरचा परकीय गुंतवणुकीचा ओघ आला होता.

# पोर्श अपघात प्रकरण : रोहित पवारांचा संताप; म्हणाले, 'डॉक्टरांनी हात धुवून घेतले, एक्साईज विभाग नशेत, किडलेल्या...

■ मुंबई: प्रथमेश चव्हाण

पुण्यातील कल्याणीनगर भागात एका अल्पवयीन मुलाने पोर्श ही आलिशान कार चालवत दोघांना चिरडल्याची घटना काही दिवसांपूर्वी घडली. ही घटना घडल्यानंतर आरोपी असलेल्या अल्पवयीन मुलाला न्यायालयाने निबंध लिहायला सांगत काही अटी घालत जामीन दिला होता. त्यानंतर संत्पत प्रतिक्रिया प्रतिक्रिया उमटल्या. यानंतर या प्रकरणात पोलीसांनी कारवाई करत अल्पवयीन मुलाचे वडील, आजोबा, पब चालक, व्यवस्थापक यांना अटक केली. तसेच आरोपीलाही पुन्हा बाल न्याय मंडळासमोर हजर केलं असता बाल न्याय मंडळाने १४ दिवसांसाठी आरोपीची बाल सुधारगृहात रवानगी केली. यानंतर आरोपीच्या रक्ताच्या नमुन्यात फेरफार झाल्याची माहिती समोर आली. या प्रकरणात ससून रुग्णालयाचे दोन डॉक्टरांनाही अटक झाली. तसेच कारवाई करण्यात उशीर केल्याप्रकरणी दोन पोलिसांचेही निलंबित झाले. यानंतर आरोपीच्या रक्ताच्या नमुन्यात फेरफार करण्यात आरोपीच्या आईचाही सहभाग असल्याची माहिती समोर आली. या प्रकरणी आरोपीच्या आईलाही पोलिसांनी अटक केली. पोर्श कार अपघात प्रकरणावर आता राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी ट्विट करत या संपूर्ण घटनेवर भाष्य करत संताप व्यक्त केला आहे.



'या अपघात प्रकरणानंतर पोलीस अधिकाऱ्यांचे कारनामे उघडकीस आले, डॉक्टरांनी हात धुवून घेतले, आरटीओनी डोळे मिटून दूध पिलं, राज्य उत्पादन शुल्क विभाग नशेत आहे, या किडलेल्या व्यवस्थेची बायपास सर्जरी करावी लागणार आहे', अशा शब्दांत आमदार रोहित पवार यांनी संताप व्यक्त केला आहे.

कल्याणीनगरमध्ये दोन निष्पापांना गाडीखाली चिरडल्यानंतर किडलेल्या संपूर्ण यंत्रणेचंच पितळ उघड पडलं. पोलिस विभागातील अधिकाऱ्यांचे कारनामे उघडकीस आले, डॉक्टरांनी हात धुवून घेतले, RTO ने डोळे मिटून दूध पिलं तर एक्साईज विभाग नशेत असल्याचं दिसलं.

'कल्याणीनगरमध्ये दोन निष्पापांना गाडीखाली चिरडल्यानंतर किडलेल्या संपूर्ण यंत्रणेचंच पितळ उघड पडलं. पोलीस विभागातील अधिकाऱ्यांचे कारनामे उघडकीस आले. डॉक्टरांनी हात धुवून घेतले. आरटीओने डोळे मिटून दूध पिलं तर एक्साईज विभाग नशेत असल्याचं दिसलं. बाल न्याय मंडळानेही 'निबंध' लिहायला सांगून दोघांचा बळी घेणाऱ्या आरोपीला एका दिवसात मोकळं सोडलं.

# थेट प्रसारमाध्यमांशी बोलता येणार नाही, पोलिसांकडेही जाण्याची मुभा नाही; मुंबई विद्यापीठाचे वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी नियम

■ मुंबई: माधव अलवा

मुंबई विद्यापीठाच्या वसतिगृहाच्या खाणावळींमधील अस्वच्छता व खाद्यपदार्थांच्या निकृष्ट दर्जामुळे विद्यार्थ्यांना सातत्याने मनःस्ताप सहन करावा लागत आहे. या गलथान कारभाराविरुद्ध वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी अनेकदा आवाज उठवला आहे, मात्र अद्यापही परिस्थितीत सुधारणा झालेली नाही. ही विदारक परिस्थिती असताना वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मुंबई विद्यापीठाने बनविलेली नियमावली जाचक ठरत आहे. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना वसतिगृह अधिक्षकांच्या पूर्वपरवानगीशिवाय थेट प्रसारमाध्यमांशी संवाद साधता येणार नाही व पोलिसांकडेही तक्रार करता येणार नाही, असे नियमावलीत नमूद केले आहे. एकीकडे विद्यापीठ प्रशासन सकारात्मक प्रतिसाद देत नाही आणि दुसरीकडे प्रसारमाध्यमांकडे जाण्यासही बंदी घालण्यात आल्यामुळे विद्यार्थी हतबल झाले आहेत.

मुंबई विद्यापीठाच्या कलिना संकुलातील व इतर ठिकाणी असणाऱ्या वसतिगृहांची अवस्था दिवसेंदिवस बिघडत चालली आहे. वसतिगृहांतील खाणावळींमध्ये अस्वच्छतेचे वातावरण असून कर्मचारी स्वच्छतेचे कोणतेही निकष पाळत नाहीत. विद्यार्थ्यांच्या जेवणात झुरळ, माशी आढळल्याचे प्रकारही घडले. तसेच अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) वसतिगृहाच्या खानावळीमधील अन्नपदार्थाचे नमुने तपासणीसाठी नेले होते आणि मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनीही खानावळीची पाहणी केली आहे. परंतु, तरीही वसतिगृहांतील खाणावळींमध्ये सुधारणा झालेली नाही. वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठीच्या नियमावलीतील नियम क्रमांक ११ नुसार वसतिगृहातील कोणताही विद्यार्थी वसतिगृह अधीक्षकांच्या पूर्वपरवानगीशिवाय पोलीस आणि प्रसारमाध्यमांशी बोलू शकत नाही. तसेच पोलीस व प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी पूर्वपरवानगीशिवाय वसतिगृहाच्या आतमध्ये येऊ शकत नाही. नियम क्रमांक १२ नुसार विद्यार्थी हा थेट कुलगुरू, प्र – कुलगुरू, कुलसचिव आणि पोलिसांकडे तक्रार करू शकत नाही. विद्यार्थ्याने वसतिगृह अधीक्षकांच्या माध्यमातून तक्रार नोंदवावी. दरम्यान, नियम क्रमांक १३ नुसार विद्यार्थी व प्रशासनामधील अधिकाऱ्यांमध्ये संपर्काचा दुवा असणारी विद्यार्थ्यांची पाच सदस्यीय 'वसतिगृह नियामक शिस्तपालन समिती' (एचआरडीसी कमिटी) विद्यापीठ प्रशासनाकडून नेमण्यात येईल. परंतु ही समितीच विद्यापीठातील विविध वसतिगृहांमध्ये नसल्यामुळे प्रश्न व समस्या मांडायच्या कोणाकडे ? असा प्रश्न विद्यार्थ्यांपुढे निर्माण झाला आहे.



प्रसारमाध्यमांशी बोलणे आणि पोलिसांकडे तक्रार करणे, हे आमचे व्यक्तीस्वातंत्र्य आहे. आम्हाला भेडसावत असलेल्या समस्यांबाबत तक्रार करण्यासाठी जेव्हा आम्ही वसतिगृह अधीक्षक, कुलसचिव, प्र – कुलगुरू, कुलगुरू यांच्याकडे पत्रव्यवहार करतो किंवा संवाद साधतो, तेव्हा कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही. वसतिगृह अधीक्षकही प्रभारी आहेत. विविध वसतिगृहांमध्ये एचआरडीसी कमिटी नाही, अधिसभेत नोंदणीकृत पदवीधर गटाचे सदस्य नाहीत, त्यामुळे व्यथा मांडायच्या कोणाकडे असा प्रश्न निर्माण होतो. मुंबई विद्यापीठ प्रशासनाने विद्यार्थ्यांवर नियम लादण्यापेक्षा वसतिगृहांच्या विदारक परिस्थितीमध्ये सुधारणा करावी. खाणावळींमधील अन्नपदार्थांचा दर्जा सुधारण्याकडे लक्ष द्यावे.

# 'संघर्षयोद्धा... मनोज जरांगे पाटील' आणि 'आम्ही जरांगे – गरजवंत मराठ्यांचा लढा' चित्रपट १४ जून रोजी

■ मुंबई: रघुवीर जाधव

मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी आंदोलन करणारे मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या जीवनावर आधारित 'संघर्षयोद्धाष्ठ मनोज जरांगे पाटील' आणि 'आम्ही जरांगे – गरजवंत मराठ्यांचा लढा' हे दोन चित्रपट १४ जून रोजी प्रदर्शित होणार आहे. एकाच दिवशी समान आशयाच्या या दोन चित्रपटांच्या प्रदर्शनामुळे चित्रपटगृहात चढाओढ होणार आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील आंदोलन करीत होते. मराठा समाजाला एकत्र घेवून आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांचा जीवनप्रवास रुपेरी पडद्यावर प्रेक्षकांना पाहता येणार आहे. परंतु, एकाच दिवशी 'संघर्षयोद्धाष्ठ मनोज जरांगे पाटील' आणि 'आम्ही जरांगे – गरजवंत मराठ्यांचा लढा' हे दोन चित्रपट प्रदर्शित होणार असल्यामुळे नक्की कोणता चित्रपट पाहावा याबाबत प्रेक्षकांची तारांबळ उडणार आहे. नारायणा प्रोडक्शन निर्मित आणि योगेश पांडुरंग भोसले दिग्दर्शित, 'आम्ही जरांगे – गरजवंत मराठ्यांचा लढा' या चित्रपटाचा टिझर बुधवार, २९ मे प्रदर्शित करून चित्रपटाची तारीख जाहीर केली.




तर, शुक्रवार, ३१ मे रोजी शिवाजी दोलताडे दिग्दर्शित आणि सोनाई फिल्म क्रिएशन निर्मित 'संघर्षयोद्धाष्ठ मनोज जरांगे पाटील' या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करत हा चित्रपटही १४ जून रोजी प्रदर्शित होणार असल्याचे घोषित करण्यात आले. 'संघर्षयोद्धाष्ठ मनोज जरांगे पाटील' हा चित्रपट पूर्वी २६ एप्रिल रोजी प्रदर्शित होणार होता परंतु, लोकसभा निवडणुकीमुळे या चित्रपटाची तारीख २१ जून करण्यात आली. पण, पुढे पावसाळा असल्यामुळे शेतीची कामे सुरु होतील म्हणून आणि प्रेक्षकांच्या विनंती आणि आग्रहामुळे 'संघर्षयोद्धाष्ठ मनोज जरांगे पाटील' हा चित्रपट १४ जून रोजी प्रदर्शित होणार असल्याचे दिग्दर्शक शिवाजी दोलताडे यांनी सांगितले.

# नौदल अधिकाऱ्याचे क्रेडीट कार्ड वापरून परदेशात खरेदी, कफ परेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

■ मुंबई: यश सावंत

नौदल अधिकाऱ्याचे क्रेडीट कार्ड वापरून परदेशात व्यवहार झाल्याचे उघड झाले आहे. त्याप्रकरणी कफ परेड पोलीस अधिक तपास करत आहेत. तक्रारदार यांचा मोबाइल हॅक करून हा प्रकार करण्यात आल्याचा संशय आहे. त्याबाबत पोलीस अधिक तपास करत आहेत. नौसेनत ट्रायल अधिकारी म्हणून कार्यरत असणारे ३९ वर्षाचे तक्रारदार सध्या त्यांच्या कुटुंबियांसह कफ परेड परिसरात राहतात. त्यांचे एका खाजगी बॅंकेत खाते असून त्या बॅंकेने त्यांना क्रेडिट कार्ड दिले होते. तक्रारीनुसार, या कार्डची गोपनीय माहिती त्यांनी आतापर्यंत कोणालाही सांगितली नव्हती. त्यानंतरही २१ मे रोजी त्यांच्या मोबाईलवर दोन संदेश आले. त्यात त्यांच्या क्रेडीट कार्डद्वारे खरेदी-विक्री करण्यात आली होती. हे सर्व व्यवहार




अमेरिकन डॉलर्समध्ये करण्यात आले आहेत. त्यामुळे त्यांनी बॅंकेच्या ग्राहक सेवेशी संपर्क साधला असता त्यांच्या क्रेडिट कार्डचा वापर करून सुमारे ४६ हजार रुपयांचे व्यवहार झाल्याचे सांगण्यात आले. त्यांनी त्यांच्या कार्डची माहिती किंवा पासवर्ड कोणालाही दिला नव्हता. तरीही त्यांच्या कार्डवरुन दोन ऑनलाईन व्यवहार झाले होते. त्यामुळे त्यांनी त्यांचे क्रेडिट कार्ड तात्पुरते बंद करण्याची विनंती केली होती. या घटनेनंतर त्यांनी सायबर हेल्पलाईन क्रमांक १९३० वर दूरध्वनी करुन तक्रार केली होती. तक्रारीनंतर त्यांनी कफ परेड पोलिसांना घडलेला प्रकार सांगून तेथेही तक्रार केली होती. हे व्यवहार झाले त्यावेळी तक्रारदार कर्तव्यावर होते. प्राथमिक तपासात मोबाइलवर नियंत्रण मिळवण्यात आले होते, असा संशय आहे.

# रस्त्यांची कामे ७ जूनपूर्वी पूर्ण करावी; तडजोड, दिरंगाई खपवून घेणार नाही, अतिरिक्त पालिका आयुक्त बांगर यांचा इशारा

■ मुंबई: सचिन कदम

पालिका प्रशासनातर्फे मुंबईत सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामातील दिरंगाई आणि गुणवत्तेशी तडजोड खपवून घेतली जाणार नाही. तसेच पूर्व द्रुतगती महामार्गावरील सेवा रस्ते वाहतूकयोग्य असावेत. त्यासाठी आवश्यक त्या सुधारणा, योग्य ठिकाणी पुनर्पृष्ठीकरण करावे. पुनर्पृष्ठीकरण करताना सखल भागात पावसाचे पाणी साचणार नाही याची खबरदारी घ्यावी. तसेच येत्या ७ जूनपूर्वी हे रस्ते पूर्णपणे वाहतूकयोग्य झाले पाहिजेत, असे आदेश अतिरिक्त महानगरपालिका



आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले आहेत.

मुंबई महानगरात ठिकठिकाणी रस्ते बांधणी व दुरुस्तीची कामे वेगाने पूर्ण केली जात आहेत. बांगर यांनी शुक्रवारी पूर्व द्रुतगती महामार्गावरील विविध ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन रस्ते दुरुस्ती कामांची पाहणी केली. चेंबूर पूर्व येथील के.बी. गायकवाड नगर, कुर्ला येथील राहुल नगर, घाटकोपर येथील छेडा नगर, पंत नगर जंक्शन, जोगेश्वरी – विक्रोळी जोड रस्ता जंक्शन आणि घाटकोपर पूर्वस्थित नालंदा नगरमधील रस्त्यांच्या कामांची पाहणी करून त्यांनी आढावा घेतला.

# २० अवैध फलकांचे पनवेलमध्ये पाडकाम सुरू



■ पनवेल: आकाश कांबळे

पनवेल तालुक्यामधील कोन सावळा रस्त्यावर २० अवैध फलकांचे पाडकाम सार्वजनिक बांधकाम विभागाने शुक्रवारपासून हाती घेतले आहे. तालुक्यातील कोन सावळा मार्गावरील फलक पाडण्यासाठी शुक्रवार ते पुढील आठवड्यापर्यंत जोरदार मोहीम राबविली जाणार आहे.

पनवेल तालुक्यामध्ये अनेक रस्त्यांवर खासगी जमिनी आणि सरकारी जमीनींवर अवैध फलक उभारले गेले आहेत. मागील अनेक वर्षे सरकारी जमीनींवर फलक उभारुन त्याचे भाडे घेणारी टोळी पनवेलमध्ये सक्रीय आहे. कोन सावळा रस्त्यालगत २० फलक काढण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी मिलिंद कदम यांनी २ क्रेन यंत्र आणि १० मजूर घेऊन पाडकाम सुरू केले.

घाटकोपर येथील फलकाच्या दुर्घटनेत अनेकांचा बळी गेल्यावर का होईना मात्र सरकारी यंत्रणा पनवेलमध्ये अवैध फलकांविरोधात जोरदार मोहीम राबवित आहे. कोन सावळा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात असल्याने सरकारी जमिनीवर हे अवैध फलक उभारल्याने अनेक वर्षांपासूनचे अवैध फलकांच्या माध्यमातून व्यवसायातून उत्पन्न कमविणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# अहिल्यादेवींची ज्ञानसंवर्धनाची दृष्टी



**सांस्कृतिक, धार्मिक परंपरा आणि आर्थिक विषयाची सांगड घालून समाजात बदल घडविण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी विशेष प्रयत्न केले. ज्ञान संपादन व संवर्धन याविषयी आस्था हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक विशेष पैलू. त्रिशताब्दी जयंतीवर्षानिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कर्तृत्व बहुपैलू असे होते. त्यांना केवळ राजकारणच नव्हे, तर विविध विषयांत स्वारस्य होते. ज्ञानाविषयी आस्था होती. त्या अतिशय धार्मिक वृत्तीच्या होत्या आणि त्यांच्या संग्रहात अनेक धार्मिक ग्रंथांसह लोकोपयोगी पुस्तके होती. अहिल्यादेवी त्या त्या विषयाच्या जाणकार लोकांना आपल्या दरबारात बोलावून घेऊन त्यांच्याबरोबर ग्रंथांवर चर्चा करीत. त्यांचा यथोचित सन्मान करीत असत.**

जुन्या जाणत्या लोकांचा अनुभव सर्वांसाठी मैलाचा दगड असतो, त्यामुळे असे जाणते लोक आपल्या पदरी असावेत, या विचाराप्रमाणे अहिल्यादेवींनी जाणत्या लोकांची पारख करून त्यांना महेश्वरात राजाश्रय बहाल केला होता. त्यांनी ज्ञानाचा आणि ज्ञानी लोकांचा सन्मान करण्याची परंपरा सुरू केली होती. अहिल्यादेवी होळकर यांचा धर्मावर प्रचंड विश्वास होता, म्हणून त्यांनी विविध धार्मिक पुस्तके व शास्त्रावर चर्चा घडवून आणली होती. जे लोक धर्माच्या नावाखाली रयतेचे शोषण करीत होते, त्यांना धर्मातील चालीरीतीनुसार चोखपणे उत्तर देण्याचे धाडस अहिल्यादेवींनी धर्मग्रंथाच्या आधारे वेळोवेळी केलेले दिसून येते. दुर्मिळ पोथ्या, धार्मिक ग्रंथ, महत्त्वाच्या विषयांवरील पुस्तके यांचे जतन करण्याची त्यांची दृष्टी वाखाणण्याजोगीच.

ज्ञानेश्वरी ग्रंथाचे महेश्वर येथे पारायण त्यांनी केले. भगवद्‌तगीतेचा भावार्थ ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून समजून घेतल्यानंतर अहिल्यादेवींनी ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या अनेक प्रती तयार करून घेतलेल्या आहेत. त्यांनी तयार करून घेतलेल्या ज्ञानेश्वरीच्या हस्तलिखित ग्रंथाची प्रत इंदूरच्या शासकीय संग्रहालयात जतन करण्यात आलेली आहे. ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या पारायणासाठी त्यांनी खास व्यक्तीची नियुक्ती केली होती. माळव्यात शिलेदारीसाठी गेलेल्या मराठी भाषिक लोकांना ज्ञानेश्वरी ग्रंथ पारायणात अहिल्यादेवी सहभागी करुन घेत असत. कीर्तन, भजन, पारायण, आख्यान करणाऱ्या लोकांना होळकर राज्यात मोठा सन्मान होता. अहिल्यादेवींनी महेश्वर ते पंढरपूर अशी पालखी सुरू केली. माऊलींच्या आळंदी गावाशी नाते जोडलेले आहे. आळंदीत अहिल्यादेवींनी श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर स्थापन केलेले असून तिथे नियमितपणे पूजाअर्चा केली जाते.

ग्रंथसंग्रह आणि संवर्धन याविषयी त्यांना कमालीची आत्मीयता होती. त्यांच्या संग्रहातील काही ग्रंथांच्या नावावर नजर टाकली तरी या त्यांच्या पैलूची उत्तम कल्पना येते. श्रीहरी (अठरा भाग), मुहूर्त चिन्तामणी, स्वर्ग आरोहण, वान पर्व, पंचतरणी गीता, गीता-गोविन्द, व्यंकटेश स्तोत्र, अध्यात्म रामायण (सात भाग), उद्योग पर्व, ज्ञानेश्वरी, ज्ञानेश्वरी नमन्, कान्यकुब्ज माहात्म्य, द्रोण पर्व, रुक्मिणी स्वयंवर, मल्हारी कवच, भगवद्‌गीता, रूद्र न्यास, श्रवण निर्णय, विष्णू सहस्त्रनाम, रघुवंश, भीष्मपर्व इत्यादी ग्रंथ अहिल्यादेवींच्या संग्रही होते. या ग्रंथांचे महत्त्व समजून घेऊन त्यांनी या ग्रंथाच्या अनेक हस्तलिखित तयार करून घेतल्या होत्या. सुंदर वळणदार अक्षर असलेले तसेच व्याकरण माहिती असलेल्या लोकांना हस्तलिखित तयार करण्याचे काम देऊन दुर्मिळ ग्रंथसंपदेचे संवर्धन आणि जतन अहिल्यादेवी होळकर यांनी केलेले आहे. आजही त्यांच्या संग्रही असलेले ग्रंथ शासनाच्या पुराभिलेखारात संरक्षित केलेले आढळून येतात. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी सांस्कृतिक, धार्मिक परंपरा आणि आर्थिक विषयाची सांगड घालून समाजात बदल घडवण्यासाठी विशेष प्रयत्न केलेले दिसून येतात. त्यांनी महेश्वर येथे विविध शास्त्र आणि विषयातील पारंगत ज्ञानसंपन्न लोकांना राजाश्रय दिला. महेश्वर येथील विठ्ठलराय कानुगो यांचे दप्तरात विषय व शास्त्रप्रवीण व्यक्तींची यादी मिळाली. त्यात वेदशास्त्रसंपन्न, शास्त्र-व्याकरणाचे पंडित, कीर्तनकार, पुराणअभ्यासक, ज्योतिषतज्ज्ञ, संस्कृततज्ज्ञ, संस्कृतीचे अभ्यासक, वैद्यकशास्त्राचे तज्ज्ञ अशांचा समावेश आहे. ते देशाच्या वेगवेगळ्या भागांतून आले होते, हे विशेष. या सर्वांना वार्षिक वर्षासनासह दैनंदिन पूजाअर्चेसाठी खर्चाची तरतूद करून देण्यात आली होती. याचे तपशील या कागदपत्रांत सापडतात. ही यादी महेश्वर येथे स्थायिक झालेल्यांची असून यांच्या घराण्यातील काही लोकांना इतर ठिकाणी निर्माण केलेल्या मंदिरात पूजाअर्चा करण्यासाठी नियुक्त केलेले होते. त्यांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था करून देण्यात आलेली आहे. अहिल्यादेवींनी सिकंदरपूर लखनौ येथून यात्रेसमयी मुद्दाम स्वतःचे पालखीवर पालखी वाहक देवणी बीन किसन नाईक भोई यांना चाकर ठेवून यात्रेनंतर महेश्वर शेजारी असलेले मौजे जलकोटी गाव जहागीर दिले. आजही सदरील गावाची जहागिरी त्यांच्या वंशाकडे चालू असून हल्ली ते श्रीराजराजेश्वर व श्रीकाशीविश्वेश्वर यांच्या पालख्या निघतात, त्यावर चाकरी करीत असल्याचे म्हटले आहे. विविध ऐतिहासिक कागदपत्रांतून मिळणाऱ्या माहितीमुळे अहिल्यादेवींच्या कर्तृत्वाचे अनेक पैलू प्रकाशात आले व येत आहेत.

# घरबसल्या मोफत ऑनलाईन पॅनकार्ड काढा

आयकर विभागाने पॅनकार्ड बनवणे खूप सोप्पे आणि मोफत केले आहे. पूर्वी पॅनकार्ड काढण्यासाठी पैसे आणि वेळ देखील जास्त लागायचा आता मात्र आपण आपल्या मोबाईल द्वारे केवळ ५ मिनिट मध्ये पॅनकार्ड काढू शकता त्यासाठी हा महत्वपूर्ण लेख पूर्ण वाचा.

सर्व प्रथम आपल्याला पॅनकार्ड काढण्यासाठी google द्वारे आयकर विभागाच्या वेबसाईटवर जायचं आहे. वेबसाईटवर ची लिंक https://www.incometaxindiaefiling.gov.in/home -लिंक वर म्त्गम्व केल्या च्या नंतर एक वेब पेज उघडेल त्यानंतर डाव्या बाजूला काही लिंक दिसतील

त्यातील तुम्हाला Instant PAN Through Aadhar या लिंक वर म्त्गम्व करायचं आहे. क्लिक केल्यानंतर तुम्हाला एक नवीन वेब पेज दिसेल. हे नवीन पेज उघल्या नंतर तुम्हाला दोन पर्याय दिसतील 1) Get New PAN 2) Check Status /Download PAN असे दोन पर्याय दिसतील.

मात्र आपल्याला नवीन पॅनकार्ड काढायचं आहे त्यामुळे आपल्याला 1) Get New PAN हा पर्याय निवडावा लागेल. हा पर्याय निवडल्या नंतर एक फॉर्म उघडेल त्यानंतर पहिल्या रिकाम्या चौकटीत तुम्हाला तुमचा आधार क्रमांक टाकायचा आहे, त्यानंतर त्याच्या पुढच्या चौकटीत तुम्हाला इंग्रजी मध्ये कॅप्चा दिसेल

तो तुम्हाला नीट बघून जशाच्या तसा पुढच्या चौकटीत टाकायचा आहे. त्यानंतर तुम्हाला confirm या वर क्लिक करायचे आहे, त्या नंतर तुम्हाला Generate Aadhar OTP पर्याय निवडायचा आहे. त्यानंतर तुमच्या आधार कार्ड ला जो मोबाईल क्रमांक लिंक आहे

त्या मोबाईल क्रमांकावर एक OTP येइल तो OTP क्रमांक तुम्हाला या चौकटी टाकायचा आहे. त्यानंतर तुम्हाला Terms and Condition या पर्यायाला द्व करून validate Aadhar OTP आणि continue या पर्यायावर क्लिक करायचे आहे. त्यानंतर तुमच्या आधार कार्ड वर असलेली संपूर्ण माहिती दिसेल,

जसे की तुमचा संपुर्ण पत्ता फोटो वगैरे संपूर्ण माहिती दिसेल. त्यानंतर तुम्हाला I accept that हा पर्याय निवडायचा आहे आणि त्याच्या नंतर तुम्हाला Submit PAN request हा पर्याय निवडायचा आहे, त्याच्या नंतर तुम्हाला एक Token id/Application id मिळेल

किंवा म्त्गम्व पी असा पर्याय दिसेल त्याच्या वरती click करून तुम्ही परत सुरवातिच्या किंवा मुख्य पेज वर येता म्हणजेच जे आपण पॅनकार्ड कडण्यासाठी जे सुरवातीला पेज दजह झाले होते त्या मुख्य पेज वर येता. मुख्य पेज वर आल्यानंतर तुम्हाला Instant आधार हा पर्याय निवडायचा आहे

आणि त्याच्या नंतर check status and Download हा पर्याय निवडायचा आहे. त्यांनतर तुम्हाला पहिल्या रिक्त जागेमध्ये तुमचा आधार क्रमांक टाकायचा आहे.त्यांनतर तुम्हाला एक चौकटीत इंग्रजी मध्ये कॅप्टचा दिला असेल उदा. (Y796HB) व्यवस्थित पाहून तो जशास तसा त्याचा खाली असलेल्या रिकाम्या जागेत टाकायचा आहे,

त्यानंतर तुम्ही जो मोबाईल क्रमांक आधार कार्ड ला जोडलेला आहे त्या नंबर वर एक OTP क्रमांक येईल तो रिकाम्या जागेत टाकायचा आहे आणि नंतर submit हा पर्याय निवडायचा आहे. PAN allotment




Successful अशी सूचना दिसेल. त्याच्या खाली तुम्हाला Download PAN असा पर्याय दिसेल

त्याच्यावर click केल्यानंतर तुमचे पॅनकार्ड Download होईल Download केलेले पॅनकार्ड तुम्हा दजह करायचे आहे. ते दजह करण्यासाठी तुम्हाला एक पासवर्ड लागेल. त्या पासवर्ड च्या ठिकाणी पासवर्ड म्हणून तुम्हाला तुमची जन्म तारीख टाकायची आहे.

त्यांनातर submit या पर्यायावरती क्लिक करून तुम्हाला तुमच पॅनकार्ड ओपन करायचे आहे, त्यानंतर तुम्हाला तुमचं ओरिजन पॅनकार्ड मिळेल, त्यानंतर तुम्हाला त्याची प्रिंट काढून घ्यायांची आहे. हे पॅनकार्ड तुम्ही बॅंकिंग किंवा इतर शासकीय कामासाठी वापरू शकता. धन्यवाद !!!

# सावत्र आई झाली वैरीण, मुलांना बेदम मारहाण, ३ मुली अन् एक मुलगा बेपत्ता, ट्रेनमधून अर्ध्यातच सोडलं की विकलं? मुलीच्या मामाला वेगळीच शंका!

■ मुंबई: विशेष प्रतिनिधी

मन हेलावून टाकणारी घटना मुंबईतून समोर आली आहे. सावत्र आईच वैरणी झाल्याचा प्रकार घडलाय. मुंबईच्या अंधेरी पूर्व एमआयडी पोलीस स्टेशनच्या हद्दीमधून चार लहान मुलं हरावल्याचा धक्कादायक प्रकार घडलाय. यामध्ये सावत्र आईचा हात असल्याची शंका मामाला आहे. तीन मुली अन् एका मुलाचा यामध्ये समावेश आहे. सावत्र आईने तीन मुली अन् मुलाला विकल्याची शंका मामाने व्यक्त केली आहे. वडील आणि सावत्र आई यांच्याकडून २५ मे २०२४ रोजी चारही मुलांना बेदम मारहाण करण्यात आली होती. त्यानंतर २६ तारखेला चारही मुले घरातून दिल्लीसाठी निघाले होते. मात्र खंडवा स्टेशन वरून चारही मुले गायब झाल्याचा आरोप मुलांच्या मामांनी केला आहे. मुलांच्या मामाच्या तक्रारीवरून एमआयडीसी



पोलीस स्टेशनमध्ये बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली आहे. एमआयडीसी पोलीस आणि मुंबई गुन्हे शाखेचे पथक चारही मुलांचा शोध घेत आहे.

हरवलेली चारही मुलांमध्ये तीन बहीण, एक भाऊ आहे. २६ मे रोजी वडिलांनी आणि सावत्र आईने मुलांसोबत मारहाण केली, त्यानंतर मुलांनी घरातली पुस्तकं भंगारमध्ये विकून मिळालेला पैसे घेऊन सावत्र आई सोबत २६ तारखेला अंधेरीतून दादार आणि दादरतून कल्याण आणि कल्याणतून दिल्लीची मेल ट्रेन पकडून दिल्लीसाठी निघाले. मात्र सावत्र आई खंडवा रेल्वे स्टेशनवर पाणी भरण्यासाठी ट्रेनमधून खाली उतरली आणि ट्रेन पुढे निघून गेली. त्यानंतर सावत्र आई खंडवा रेल्वे स्टेशनवरून ट्रेन पकडून मुंबईला आली.

मुलांचे वडील पवन तिवारी हे २००२ मध्ये आरती तिवारी सोबत लग्न केले होते, मात्र कोरोना काळात २०२२ मध्ये आरतीचा मृत्यू झाला. यानंतर मुलांचे वडील २०२३ मध्ये दुसरं लग्न केले. मागील एक वर्षापासून चारही मुलं सावत्र आईसोबत राहत होते. या काळामध्ये सावत्र आई आणि वडिलांकडून मुलांना बेदम मारहाण केला जात असल्याचा आरोप मुलांच्या मामा दीनानाथ तिवारी यांनी केली आहे. मुलांचा मामा दीनानाथ तिवारीचा आरोप आहे की सावत्र आईने मुलांना विकून आली आहे.

# विवाहित बहिणीच्या प्रियकराची हत्या, आरोपीला पोलिसांकडून अटक

■ मुंबई: विशेष प्रतिनिधी

विवाहीत बहिणीच्या प्रियकराची हत्या करून त्याचा मृतदेह पुण्याजवळील एका निर्जनस्थळी फेकल्या प्रकरणी २५ वर्षीय तरुणाला अटक करण्यात आले आहे. मुख्य आरोपीसह पोलिसांनी तीन जणांना ताब्यात घेतले आहे. विवाहबाह्य अनैतिक संबंध असल्यामुळे बहिणीचा संसार उद्ध्वस्त झाला होता. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव सुजित गायकवाड आहे. बहिण आणि तीचा प्रियकर एकाच कंपनीत काम करत होते.

मिळालेल्या माहितीनुसार, आनंद गुप्ता असं हत्या झालेल्या तरुणाचे नाव होते. तो मुंबईतील एका कंपनीत सेल्स विभागात कामाला होता. भिवंडी येथे सहकुटुंब राहत होता. २८ मे रोजी त्यांची हत्या करण्यात आली होती. सुजितची बहिण आणि आनंद यांच्यात काही वर्षापासून प्रेम होते. हे प्रेम सुजितला मान्य नव्हता. तो नेहमी आनंदला बहिणीपासून





दूर राहण्याची विनंती करायाचा परंतु त्याने एक ऐकले नाही. यासदंर्भात बोलण्यासाठी सुजितने आनंदला भेटण्यासाठी बोलवलं होतं परंतु त्यांच्यात भांडण झालं. सुजितने आनंदला भरपूर मारहाण केली. रागाच्या भरात त्याची हत्या केली. त्याचा मृतदेह पुण्याजवळील एका खदानीत फेकला. आनंदने २८ मे रोजी कुटुंबाला माहिती दिली होती की, माणकोली येथे कोणालातरी भेटण्यासाठई जात आहे. परंतु तो घरी परतलाच नाही त्यामुळे कुटुंबांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल करून घेतली. कुटुंबानी त्याचा शोध घेतला होता. कुटुंबायांनी माणकोली गाठले असता त्यांना गुप्ता यांची मोटारसायकल व रक्ताचे डाग आढळून आले. त्यानंतर ही माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला. पोलिसांनी शोध घेत मोबाईल मधून नंबर मिळवून सुजितला ताब्यात घेतले. ३० मे रोजी सुजितने चौकशीतून सर्व घटनेची माहिती दिबली. त्याच्यावर गुन्हा दाखल करून अटक करण्यात आले.

# लग्नाचा खर्च परत मिळविण्यासाठी जावयाचे अपहरण

■ मुंबई: विशेष प्रतिनिधी

लग्नात झालेला खर्च परत मिळवण्यासाठी सासरच्या मंडळींनी जावयाचे अपहरण करून त्याला डांबून ठेवल्याची घटना गोवंडीमधील शिवाजी नगर परिसरात घडल्याचे उघडकीस आले आहे. शिवाजी नगर पोलिसांनी जावयाची सुटका करून याप्रकरणी तिघांना अटक केली. गोवंडीमधील शिवाजी नगरमध्ये वास्तव्यास असलेला रिक्षाचालक




अक्रमअली कुरेशी (२४) याचा वर्षभरापूर्वी वसई येथील सकिना नावाच्या तरुणीशी विवाह झाला होता. मात्र लग्नानंतर काही दिवसांनी या दोघांमध्ये वाद सुरू झाले. नेहमीच्या वादाला कंटाळून सकिना पतीला सोडून तिच्या माहेरी वसई येथे निघून गेली. अनेक महिने उलटल्यानंतरही ती सासरी जात नसल्याने तिच्या वडिलांनी आणि इतर नातेवाइकांनी अक्रमअलीला भांडणाचे कारण विचारण्यासाठी मानखुर्द परिसरात बोलावले. ठरल्याप्रमाणे अक्रमअली आणि त्याच्या सासरची मंडळी भेटली. त्यावेळी अक्रमअली आणि सासऱ्यांमध्ये वाद झाला. त्यानंतर त्यांनी अक्रमअलीचे अपहरण केले आणि त्याला वसई येथे नेले. तेथील एका बंद खोलीत त्याला डांबून ठेवण्यात आले. तसेच लग्नासाठी झालेला खर्च परत करण्याची मागणी त्याच्याकडे करण्यात आली.

# दोन महिन्यांचे बाळ पुन्हा अविवाहितेच्या ताब्यात, बालकल्याण समितीची उच्च न्यायालयात माहिती

■ मुंबई: विशेष प्रतिनिधी

लैंगिक छळातून जन्मलेल्या आणि जन्मताच सेवाभावी संस्थेच्या हवाली केलेल्या दोन महिन्यांच्या बाळाचा अविवाहित मातेला पुन्हा एकदा ताबा मिळाला आहे. या बाळाला तिच्या ताब्यात देण्यात आल्याची माहिती बाल कल्याण समितीतर्फे बुधवारी उच्च न्यायालयाला देण्यात आली. त्यानंतर, या बाळाची याचिकाकर्तीतर्फे योग्य ती देखभाल, संगोपन केले जात आहे की नाही यावर न्यायालय वर्षभर देखरेख ठेवण्यात येईल, असेही न्यायालयाने यावेळी प्रामुख्याने स्पष्ट केले.

बाळाला सेवाभावी संस्थेकडे सोपवण्याबाबतचे हमीपत्र रद्द करावे. तसेच, बाळाला दत्तक देण्यापासून समितीसह आशा सदन बालगृह संस्थेला रोखण्याचे आणि बाळाला पुन्हा आपल्या ताब्यात देण्याचे आदेश द्यावेत या मागणीसाठी याचिकाकर्तीने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. तिच्या याचिकेची दखल घेऊन न्यायालयाने बालकल्याण समितीला तिच्या मागणीबाबत विचार करण्याचे आदेश दिले होते. या पार्श्वभूमीवर बुधवारी न्यायमूर्ती नितीन बोरकर आणि न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरेसन यांच्या सुट्टीकालीन खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्यावेळी, याचिकाकर्तीच्या बाळाला तिच्या ताब्यात देण्यात आल्याची माहिती समितीतर्फे



न्यायालयाला देण्यात आली.

दरम्यान, दुबईत नोकरी करत असताना वरिष्ठाकडून आपले लैंगिक शोषण झाले. त्यातूनच आपण गर्भवती राहिलो. परंतु, सहा महिन्यानंतर ही बाब आपल्या लक्षात आली. एका पुराणमतवादी कुटुंबातील असल्याने त्यांच्यापासून आपण ही बाब लपवून ठेवली. दुबईला जाण्यापूर्वी कल्याणमध्ये सामाजिक कार्यकर्त्या म्हणून आपण काम केले होते. त्यातील ओळखीतूनच आपल्याला आशा सदन बालगृहाबाबत कळले. त्यानुसार, प्रसूतीसाठी आपण आशा सदनमध्ये दाखल झालो व २९ मार्च रोजी आपल्या मुलीचा जन्म झाला. सगळ्या प्रकाराबाबत कळल्यावर कुटुंबीयांनी पाठिंबा दिला व बाळाला घरी आणण्यास सांगितले. आशा सदनच्या पदाधिकाऱ्यांनी ५ एप्रिल रोजी बाळाला घरी घेऊन जाण्यास सांगितले. मात्र, त्यावेळी आपल्याकडून बाळाच्या आत्मसमर्पण करारावर स्वाक्षरी घेण्यात आली. तसेच, निर्णय बदलायचा असल्यास त्याबाबत ६० दिवसांत निर्णय घेण्याची अट असल्याचे सांगितले. बाळाला संस्थेकडे सोपल्याचे नव्हते. परंतु, त्याचा पुन्हा ताबा मिळवण्याचा हा एकमेव पर्याय आपल्याकडे उपलब्ध असल्याचे संस्थेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी आपल्याला सांगितले.

त्यानुसार, २६ एप्रिल रोजी वकिलासह आपण आशा सदनमध्ये गेलो आणि बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) कायद्यांतर्गत बाळाला संस्थेच्या हवाली देण्याच्या इच्छेचा पुनर्विचार करायचा असल्याबाबत अर्ज केला. त्यात बाळाला संस्थेच्या हवाली केल्याबाबत केलेला करार रद्द करण्याचीही मागणी केली. मात्र, आपली मागणी फेटाळण्यात आली. त्यामुळे, बालकल्याण समितीकडे दाद मागितली. परंतु, तिथेही पदरी निराशा पडली. म्हणून उच्च न्यायालयात धाव घेतल्याचे याचिकार्तीने याचिकेत म्हटले होते.

# पतीनेच हडप केली पत्नीच्या विमा पॉलिसीची रक्कम

■ सांगली: विशेष प्रतिनिधी

विभक्त पत्नीच्या नावे असलेल्या दोन विमा पॉलिसी पतीनेच दोघा विमा प्रतिनिधींच्या संगनमताने मोडून परस्पर चार लाख ९७ हजार रुपये हडप केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पती व दीरासह



पती- पत्नी असलेल्या दोघा विमा प्रतिनिधींवर विश्रामबाग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. गुन्हा दाखल झालेल्यात राहुल अशोक माने (वय ४३) व रोहित अशोक माने (वय ३३, दोघेही रा. सुमेदा प्रसाद अपार्टमेंट, गावभाग, सांगली), विमा प्रतिनिधी शेखर स्वामी व त्याची पत्नी शोभना शेखर स्वामी (रा. सेंट्रल स्कूलमागे, वारणाली, विश्रामबाग) अशा चौघांचा समावेश आहे. याप्रकरणी श्रुती राहूल माने (वय ३९, रा. लोकल बोर्ड कॉलनी, टाटा पेट्रोल पंपनजीक, विश्रामबाग) यांनी विश्रामबाग पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. विश्रामबाग पोलिस ठाण्याकडून मिळालेली अधिक माहिती अशी, की श्रुती माने या पती राहुल माने याच्यापासून विभक्त राहतात. श्रुती माने यांनी दोन विमा पॉलिसी उतरविल्या होत्या. त्या पॉलिसीचे पैसे त्या स्वतः भरत होत्या. आपल्या पतीपासून विभक्त झाल्यानंतर या विमा पॉलिसीची खातरजमा करण्यासाठी दि. २५ सप्टेंबर २०२३ रोजी श्रुती माने विमा कार्यालयात गेल्या होत्या. तिथे चौकशी केली असता या दोन्हीही विमा पॉलिसी मुदतीपूर्वीच मोडण्यात आल्या असल्याची माहिती मिळाली.


याबाबत श्रुती माने यांनी अधिक माहिती घेतली असता या दोन्हीही विमा पॉलिसी मुदतीपूर्वीच पती राहूल माने यांनी मोडल्याचे व त्यापोटी जमा झालेले चार लाख ९७ हजार रुपये परस्पर काढून घेतल्याचे समोर आले. श्रुती माने यांच्या बनावट स्वाक्षरी करुन राहुल माने व अन्य तिघांनी संगनमताने फेब्रुवारी २०२१ ते दि. २५ सप्टेंबर २०२३ या कालावधीत हा अपहार केला. विमा पॉलिसी रक्कम परस्पर काढून व वापरुन आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच श्रुती माने यांनी पती, दीर व त्या दोघा विमा प्रतिनिधी यांच्याकडे विचारणा केली.

# डॉ. पायल तडवी आत्महत्या प्रकरणः तिन्ही आरोपी डॉक्टरांना दोषमुक्त करण्यास विशेष न्यायालयाचा नकार

■ मुंबई: विशेष प्रतिनिधी

डॉ. पायल तडवी आत्महत्या प्रकरणातून डॉ. अंकिता खंडेलवाल, डॉ. भक्ती मेहेरे आणि डॉ. हेमा अहुजा या तिघींना दोषमुक्त करण्यास विशेष न्यायालयाने नकार दिला. तसेच, या तिघींवर पुढील सुनावणीपासून आरोप निश्चितीची प्रक्रिया सुरू केली जाईल, असेही न्यायालयाने त्यांना दिलासा नाकारताना स्पष्ट केले.

प्रकरणातून दोषमुक्त करण्याची तिघींची मागणी फेटाळताना प्रत्येकी २५ हजार रूपयांचा दंडही विशेष न्यायालयाने त्यांना सुनावला. त्याचप्रमाणे दंडाची रक्कम डॉ. तडवी यांच्या कुटुंबीयांना द्यावी, असे आदेशही दिले. डॉ. पायल तणावाखाली होती आणि ती कामाचा ताण सहन करू शकली नाही. त्याच कारणास्तव तिने आत्महत्या केल्याचे भरपूर पुरावे आहेत, असा दावाही आरोपींनी दोषमुक्तीची मागणी करताना केला होता. पायल अनुसूचित जमातीतील असल्याची आपल्याला कुठल्याही प्रकारची कल्पना नव्हती. त्यामुळे, जातीवरून तिची छळवणूक केल्याचा आणि तिला आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याचा आरोप तथ्यहीन असल्याचा दावाही तिघींनी केला होता. दुसरीकडे, आरोपींनी डॉ. पायल हिचा अपमान केल्याचे आणि तिचा मानसिक व शारीरिक छळ केल्याचे पुरावे आहेत. डॉ. पायल हिने आत्महत्येपूर्वी चिठ्ठी लिहिली होती. त्यात, आरोपींनी जातीवाचक छळ केल्याचे नमूद केले आहे, असा दावा करून विशेष सरकारी वकील प्रदीप घरत यांनी आरोपींच्या दोषमुक्तीच्या अर्जाला विरोध केला होता. डॉ. पायल हिच्यासारख्या उच्चशिक्षित तरूणीने जीवन संपवण्याचा निर्णय घेतला यावरून आरोपींनी तिचा अतोनात छळ केल्याचे आणि जीवन संपवण्याचा



एकमेव पर्याय तिच्यासमोर उपलब्ध असल्याचे स्पष्ट होते, असा दावाही सरकारतर्फे करण्यात आला. डॉ. पायल हिने २२ मे २०१९ रोजी नायर रुग्णालयाच्या वसतिगृहामध्ये गळफास लावून आत्महत्या केली होती. तिच्यावर सतत जातीवाचक शेरेबाजी करून तिचा मानसिक छळ केल्यामुळे तिने आत्महत्या केल्याचा आरोप तिच्या कुटुंबियांनी केला. त्यानंतर, पोलिसांनी या प्रकरणी आरोपींवर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये (अॅट्रोसिटी) गुन्हा दाखल केला होता.

# मुंबई विमानतळावरून १० किलो सोनं जप्त, कस्टम विभागाची कारवाई

■ मुंबई: विशेष प्रतिनिधी

मुंबईमधून एक मोठी बातमी समोर आली आहे. कस्टम विभागाने मुंबई विमानतळावर मोठी कामगिरी केली आहे. मुंबई विमानतळावरून कस्टम विभागाने तब्बल १० किलो सोन जप्त केल्याची माहिती मिळत आहे. या कारवाईमध्ये कस्टम विभागाने ९.७६ किलो सोन्यासह इलेक्ट्रॉनिक उपकरणे देखील जप्त केली आहेत. मुंबई विमानतळावर सोन्याची तस्करी सुरू असल्याचं उघडकीस आलं आहे.

जप्त करण्यात आलेल्या सोन्याची आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांची किंमत ६.७५ कोटी रुपये असल्याची माहिती मिळतेय. धक्कादायक बाब म्हणजे सोन्याची तस्करी शॅम्पू बॉटल तसेच रबर शीटमधून सुरू होती. प्रवाशाने गुदद्वारातून सोन्याची तस्करी केल्याचं उघड झालं आहे. याप्रकरणी चार प्रवाशांना अटक करण्यात आली आहे.

याप्रकरणी कस्टम विभागाने ८८ लाख रुपयांच्या किमतीचे परदेशी चलन देखील जप्त केल आहे. एकूण २०



प्रकरणांमध्ये कस्टम्स विभागाने ही कारवाई केलेली आहे. आता अटकेनंतर या चार आरोपींची सोन्याच्या तस्करी प्रकरणामध्ये चौकशी सुरू आहे. या सर्वांवर मोठी कारवाई होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. या आरोपींच्या चौकशीमध्ये आणखी काही गुन्हेगार जाळ्यात सापडण्याचा अंदाज वर्तविला जात आहे. यापूर्वी मुंबई कस्टम विभागाने १० मे रोजी देखील मोठी कारवाई केली होती. मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्टवरून कस्टम विभागाने ७.४४ कोटी रुपयांचे सोनं जप्त केलं होतं. एकूण १८ प्रकरणांमध्ये ११.६२ किलो सोन जप्त करण्यात आलं होतं. यामध्ये सोन्याचे दागिने, सोन्याची पूड , विटा आणि सोन्याचं मेण स्वरूपात सोन्याची तस्करी करण्यात येत होती. याप्रकरणी कस्टम विभागाने सात प्रवाशांना अटक करून १२ लाख रूपयांची रोकड जप्त केली होती. गुदद्वार, अंतर्वस्त्र तसेच कपडे आणि बुटामध्ये लपवून सोन्याची तस्करी केली जात असल्याचं समोर आलं होतं.

# आमरसातून पतीला दिल्या गुंगीच्या गोळ्या, तुळजापूर तालुक्यातील नंदगाव येथील प्रकार; पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल

■ धाराशिव: विशेष प्रतिनिधी

आंब्याच्या रसात म्हणजेच आमरसात झोपेच्या गोळ्या टाकून पतीला आमरसातून गुंगीचे औषध देणाऱ्या पत्नीविरुद्ध तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तुळजापूर तालुक्यातील नंदगाव येथील महेशकुमार जवाहरलाल चिनगुंडे यांना पत्नी भाग्यवती महेशकुमार चिनगुंडे यांनी २४ मे रोजी सायंकाळच्या जेवणात आमरस दिले. त्यात झोपेच्या गोळया टाकल्यास त्याचे महेशकुमार यांना अपाय होवू शकतो, हे माहिती असताना तसेच कोणत्याही डॉक्टरच्या सल्ला किंवा परवानगीशिवाय रसात झोपेच्या गोळया टाकल्या.



हे आमरस महेशकुमार चिनगुंडे यांच्यासह त्यांच्या घरातील लोकांनीही सेवन केल्याने त्यांना गुंगी येवून दुसऱ्या दिवशी सकाळी उशिरापर्यंत झोप लागली. तसेच झोपेतून उठल्यानंतर त्यांना शारीरिक वेदना होवू लागल्या.

# क्षुल्लक भांडणातून वेळापुरात बुलेटस्वार शेतकऱ्यावर गोळीबार

■ सोलापूर: विशेष प्रतिनिधी

किरकोळ कारणांवरून पूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून एका बुलेटस्वार तरूण शेतकऱ्यावर बंदुकीने गोळ्या झाडून त्याचा खून करण्याचा प्रयत्न झाला. माळशिरस तालुक्यातील वेळापूर येथे एसटी बसस्थानकासमोर भर रस्त्यावर मोटारीतून आलेल्या हल्लेखोरांनी गोळीबार केला. याप्रकरणी मुख्य आरोपीला अटक करण्यात आली असून त्याचे इतर साथीदार फरारी आहेत.

कुंडलिक पांडुरंग शिंदे (वय २७, रा. दसूर, ता. माळशिरस) असे जखमी शेतकऱ्याचे नाव आहे. या गुन्ह्यात अवधूत नारायण शेंडगे (वय २४, रा. पिसेवाडी, ता. माळशिरस) यास अटक झाली असून त्याचे साथीदार अनिल शेंडगे व सागर शेंडगे यांच्यासह अन्य दोघा अनोळखी हल्लेखोरांचा वेळापूर पोलीस शोध घेत आहेत. कुंडलिक शिंदे हे शेतातील दैनंदिन कामे उरकून सायंकाळी गावाकडे बुलेट



दुचाकीने निघाले होते. वेळापूर येथे एसटी बसस्थानकासमोर पाठलाग करीत आलेली पांढऱ्या रंगाची मोटार शिंदे यांच्या बुलेटच्या पुढे अचानकपणे आडवी येऊन थांबली. त्याच क्षणी मोटारीतून अवधूत शेंडगे व अन्य साथीदारांनी बंदुकीने कुंडलिक शिंदे यांच्यावर गोळीबार केला. एक गोळी त्यांच्या डाव्या कंबरेच्या खाली लागली. तेव्हा जीवाच्या आकांताने शिंदे हे गंभीर जखमी अवस्थेत बुलेट चालवत वेळापूर पोलीस ठाण्यात पळून आले. पोलिसांना त्यांना तात्काळ रूग्णालयात दाखल केले. यासंर्भात जखमी कुंडलिक शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार त्यांच्याशी मागील वर्षात अवधूत शेंडगे याच्याशी किरकोळ कारणावरून दोनवेळा भांडण झाले होते. यात एकमेकांविरूध्द पोलिसांत गुन्हे नोंद आहेत. दरम्यान, गेल्या पाच महिन्यांपासून मुख्य आरोपी अवधूत शेंडगे हा दसूर गावात येऊन कुंडलिक शिंदे यास धमकावत होता. यातूनच त्याने आपल्या साथीदारांवर वेळापुरात शिंदे यांना गाठून त्यांच्यावर गोळीबार केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

# ऑर्केस्ट्रा बार कलाकार तरूणीवर अत्याचार: सराफाविरूध्द गुन्हा दाखल

■ सोलापूर: विशेष प्रतिनिधी

ग्राहक म्हणून आलेल्या एका ऑर्केस्ट्रा बार कलाकार तरूणीला सोलापुरात ऑर्केस्ट्रा बारमध्ये काम मिळवून देण्याचे आमीष दाखवून एका हॉटेलात बोलावून घेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केले आणि विवस्त्र करून चित्रिकरण करून समाज माध्यमांमध्ये प्रसारित करण्यासह रिव्हॉल्व्हर काढून धमकावल्याप्रकरणी एका सराफाला पोलिसांनी अटक केली आहे. माणिक सुरेश नारायणपेठकर असे आरोपीचे नाव आहे. यातील पीडिता ऑर्केस्ट्रा बार कलाकार तरूणी २६ वर्षांची असून ती मूळ आग्रा येथील राहणारी आहे. बंगळुरू येथील एका ऑर्केस्ट्रा बार कलाकार मैत्रिणीच्या सांगण्यावरून गेल्या फेब्रुवारी महिन्यात ती काम मिळविण्यासाठी सोलापुरात आली होती. ऑर्केस्ट्रा बारमध्ये काम मिळविण्याच्या प्रयत्नात असताना तिने सराफ बाजारात



माणिक नारायणपेठकर याच्या सराफ पेढीमध्ये स्वतःच्या भावासाठी सोन्याची अंगठी खरेदी केली. तेथे तिच्याशी नारायणपेठकर याने ओळख करून घेत तिचा संपर्क क्रमांक घेतला. अनेक ऑर्केस्ट्रा बार मालकांशी आपल्या ओळखी असून त्यांच्या माध्यमातून आपण काम मिळवून देऊ शकतो, असे त्याने आश्वस्थ केले होते. दरम्यान, नारायणपेठकर याने थोड्याच दिवसांनंतर पीडितेशी संपर्क साधून ऑर्केस्ट्रा बारमध्ये काम मिळवून देण्याची थाप मारत बार्शी टोल नाक्यावर ऑटोरिक्षातून येण्यास सांगितले. तेथे गेल्यानंतर नारायणपेठकर याने तिला जवळच्या हॉटेलात नेले. याच हॉटेलात अनेक ऑर्केस्ट्रा बार मालकांची ऊठबैस होते, असे सांगत नारायणपेठकर याने स्वतःची कौटुंबीक व्यथा मांडली. आपली पत्नी बदफैली असल्यामुळे शरीरसुख मिळत नाही, असे सांगितले आणि पीडितेला शरीरसुखाची मागणी केली.

# संरक्षण आस्थापनांपासून ५०० मीटरपर्यंत बांधकामांना निर्बंध कायम, सर्वोच्च न्यायालयाचेही शिक्कामोर्तब

■ मुंबई: प्रथमेश चव्हाण

संरक्षण आस्थापनांपासून ५०० मीटरपर्यंतच्या बांधकामांना असलेला निर्बंध कायम असल्याचे आता पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. कांदिवली पूर्वेतील एका बड्या गृहप्रकल्पाला तात्काळ काम थांबविण्याचे आदेश जारी करण्याचे पत्र मध्यवर्ती दारुगोळा आगाराने (सेंट्रल ऑर्डनन्स डेपो) दिले असले तरी आता यापुढे संरक्षण आस्थापनांभोवतालचे सर्वच गृहप्रकल्प अडचणीत येणार आहेत. महापालिका, म्हाडा तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणानेही या पत्राची दखल घेत आपल्या अखत्यारीतील गृहप्रकल्पांचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे. लवकरच या गृहप्रकल्पांना काम थांबविण्याच्या नोटिसा जारी केल्या जाणार आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा संरक्षण आस्थापनांभोवतालच्या इमारतींचा पुनर्विकास रखडणार आहे. संरक्षण आस्थापनांपासून १०० मीटरपर्यंत कुठलेही बांधकाम करण्यात मनाई तर १०० ते ५०० मीटर परिसरात फक्त चार मजल्यापर्यंत बांधकामास परवानगी मिळते. मात्र त्यासाठी संरक्षण आस्थापनेचे 'ना हरकत प्रमाणपत्र' बंधनकारक असल्याबाबत १८ मे २०११ मध्ये जारी केलेले संरक्षण मंत्रालयाचे परिपत्रक लागू आहे. त्यानंतर २१ ऑक्टोबर २०१६ मध्ये संरक्षण मंत्रालयाने परिपत्रक जारी करून ती मर्यादा १० मीटरवर आणली होती. मात्र हे परिपत्रक अंतिम न झाल्याने २०११ चे परिपत्रक लागू आहे, असे या पत्रात पुन्हा स्पष्ट करण्यात आले आहे. याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या



निकालाचा हवाला देण्यात आला आहे.

संरक्षण आस्थापनांच्या ५०० मीटर परिसरात इमारत बांधकामाची परवानगी देताना 'ना हरकत प्रमाणपत्र' घेण्यात यावे, या १८ मे २०११ च्या परिपत्रकामुळे या परिसरातील जुन्या इमारतींचा पुनर्विकास रखडला होता. भाजप खासदार गोपाळ शेट्टी यांनी हा विषय लावून धरल्यानंतर ही मर्यादा १० मीटरपर्यंत आणण्यात आली. त्यानुसार शासनानेही परिपत्रक काढून कार्यवाही सुरु केली. त्यामुळे शेकडो जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला. याशिवाय नौदल आस्थापनाशेजारील एका इमारतीच्या पुनर्विकासात उच्च न्यायालयाने संरक्षण मंत्रालयाने जारी केलेली मे २०११ तसेच २०१५ मधील परिपत्रके रद्द केली होती. त्यामुळे राज्य शासनाने संरक्षण आस्थापनांशेजारील बांधकामांना परवानग्या देण्यास हरकत नाही, अशी भूमिका घेतली होती. त्यानुसार अनेक गृहप्रकल्पांना संबंधित नियोजन प्राधिकरणाने परवानग्या दिल्या होत्या. मात्र सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या संबंधित आदेशात सुधारणा करीत १८ मे २०११ चे परिपत्रक कायम ठेवल्यामुळे आता संरक्षण आस्थापनांशेजारील बांधकामांवरील निर्बंध कायम राहिले आहेत. संरक्षण आस्थापनांपासून किती मीटरपर्यंत बांधकामांना परवानगी असावी, याबाबत वेगवेगळी परिपत्रके जारी करुन घोळ घालण्यात आला आहे. सुरुवातीला ५०० मीटरपर्यंत कुठलेही बांधकाम करता येत नव्हते. ती मर्यादा १० मीटरपर्यंत आणण्यात आली. त्यात पुन्हा सुधारणा करीत ती मर्यादा १०० मीटर पर्यंत करण्यात आली. मात्र त्या निर्णयालाही स्थगिती देण्यात आली. आतापर्यंत जारी करण्यात आलेल्या परिपत्रकापैकी आता मे २०११ मधील परिपत्रकच लागू असल्यामुळे बांधकामांवर पुन्हा निर्बंध आले आहेत. त्यामुळे अनेक गृहप्रकल्पांना फटका बसणार आहे.

## 'मी स्वतःला संपवून घेईन', बजरंग सोनवणे यांची निवडणूक अधिकाऱ्याला धमकी

■ बीड: यश सावंत

बीड लोकसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शरद पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनवणे आज चांगलेच आक्रमक झाले. बजरंग सोनवणे यांनी निवडणूक अधिकाऱ्यांना स्वत:ला संपवून घेण्याची धमकी दिली. सोनवणे यांनी निवडणूक अधिकारी महेंद्र कांबळे यांना धमकी दिली. 'कांबळे साहेब हात आकडू नका. अन्यथा मी स्वत:ला संपवून घेईन', असं वक्तव्य बजरंग सोनवणे यांनी केलं. त्यांच्या या वक्तव्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. स्ट्रॉंग रुमच्या पाहणीदरम्यान



बजरंग सोनवणे यांनी संबंधित वक्तव्य केलं. त्यांच्या या वक्तव्यानंतर बीडच्या राकारणात काय-काय घडामोडी घडतात ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. यावेळी त्यांनी आपली भूमिका मांडली. 'मी काय बोललो हा विषय नाही. त्यांनी लोकशाही जिवंत ठेवली नाही तर बीड जिल्हा काय म्हणेल? त्यांनी लोकशाही जिवंत ठेवावी, अशी प्रतिक्रिया बजरंग सोनवणे यांनी दिली', असं बजरंग सोनवणे म्हणाले. 'स्ट्रॉंग रुमला येण्याचं कारण हे की, जिल्हाधिकारी इथे आहेत. त्यांच्याशी मला काही चर्चा करायची आहे. त्यामुळे मी इथे आलो आहे. त्यांनी मला काही गोष्टी विचारल्या आहेत.

## संजय राऊत यांचा दावा, 'लाडू, पेढे, जिलबी, फाफडा सगळं तयार ठेवलं तरीही भाजपाचा पराभव...'

■ मुंबई: सचिन कदम

निवडणूक आयोगाला आम्ही १७ पत्रं लिहिली आहेत. तरीही काहीही उपयोग झालेला नाही, आमच्या तक्रारींची दखल घेतली गेलेली नाही. भाजपाला मतदान करा, रामलल्लाचं फूकट दर्शन घडवू या घोषणेची तक्रार करणारं पत्रही आम्ही पाठवलं. त्याची तर पोचही आम्हाला निवडणूक आयोगाने पाठवली नाही असं संजय राऊत यांनी म्हटलं आहे.

१७ पत्रांपैकी एकाही पत्राला उत्तर देण्यात आलेलं नाही. महाराष्ट्रात यंत्रणेचा आणि सरकारी यंत्रणेचा गैरवापर सुरु आहे, पैशांचं वाटप सुरु आहे. मुख्यमंत्री, भाजपाचे नेते यांच्यासंदर्भातल्या या तक्रारी आहेत. याची दखल घेण्यात आलेली नाही. मात्र २० मे रोजी उद्धव ठाकरेंनी जी पत्रकार परिषद घेतली, त्यासंदर्भात भाजपाचे पदाधिकारी



पत्र पाठवतात आणि केंद्रीय निवडणूक आयोग किती तत्परतेने कारवाईचे आदेश देतो, आम्ही या कारवाईचं स्वागत करतो. असा टोला संजय राऊत यांनी लगावला आहे. केंद्रीय निवडणूक आयोग हा भाजपाची एक शाखा आहे. निवडणूक आयोग स्वतंत्र नाही, निष्पक्षपणे वागत नाही. या सगळ्याचा जाब त्यांना उद्या संध्याकाळनंतर द्यावा लागणार आहे. नरेंद्र मोदी परवा ध्यान करायला बसले तो प्रचार नव्हता का? सर्व वृत्तवाहिन्यांच्या १० कॅमेरे लावून ध्यान करायला बसले. सगळ्या माध्यमांकडून त्याचं चित्रीकरण चोवीस तास करण्यात आलं. तीदेखील एक मूक पत्रकार परिषदच होती.

## भुयारी मार्ग तरीही जीव धोक्यात घालून पामबीच मार्ग ओलांडण्याचे प्रकार सुरू

■ नवी मुंबई: धनश्री सट्टा

नवी मुंबईचा राणीचा रत्नहार समजल्या जाणाऱ्या पामबीच मार्ग ओलांडताना आतापर्यंत ११ ग्रामस्थांचा जीव गेला आहे. मासेमारीकरिता समुद्रात जाण्यासाठी भल्या पहाटेच पामबीच मार्ग ओलांडताना या ग्रामस्थांचा जीव गेला आहे. त्यावर उपाय म्हणून करावे गावाजवळ पामबीच मार्गावर कोट्यवधी रुपये खर्चातून भुयारी मार्ग उभारला आहे. तरीही ग्रामस्थ जीव धोक्यात घालून वेगवान पामबीच मार्ग ओलांडतात. भुयारी मार्गातून जाण्याऐवजी पामबीच मार्ग ओलांडण्याचा 'शॉर्टकट' धोकादायक असून नागरिकांनी पामबीच मार्गावर लावलेल्या बॅरिकेड्स काढल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. पामबीच मार्गावर सुसाट वेगाने धावणाऱ्या गाड्या पाहायला मिळतात. या मार्गावर ताशी ६० किमी वेगाची मर्यादा असताना अतिवेगाने धावणाऱ्या गाड्यांमुळे अपघात होतात. तर दुसरीकडे नियमबाह्य वाहने चालवून सिग्नल तोडणाऱ्यांची संख्याही अधिक आहे. त्यामुळे अनेक अपघात घडतात. त्यात अनेकांना प्राणही गमवावे लागले आहेत. करावे गाव येथून नवी मुंबई विकसित होण्यापूर्वीपासून पामबीच मार्गावर मिठागरे तसेच करावे खाडी येथून मुंबईहून मासे आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात मच्छीमार बांधव पामबीच मार्ग ओलांडून जातात.



पहाटेच्या वेळी रस्ता ओलांडताना आतापर्यंत ११ ग्रामस्थांचा अपघातात जीव गेला आहे. त्यामुळे स्थानिक नगरसेवक म्हात्रे दाम्पत्य यांनी भुयारी मार्गाची मागणी केली व पालिकेच्या माध्यमातून परिसरात भुयारी मार्ग बांधला तसेच या भुयारी मार्गाच्या प्रवेशद्वारावरच पामबीच मार्गावर अपघाती निधन झालेल्या ११ जणांच्या नावांच्या पाट्या लावल्या आहेत. परंतू तरीदेखील मासेमारी करण्यासाठी जाणारे ग्रामस्थ आजही वेगवान पामबीच मार्ग ओलांडून जातात. त्यामुळे या मार्गावर अपघाताची दाट शक्यता आहे. पामबीच मार्गावर दोन्ही दिशांना पालिकेने रस्ता ओलांडू नये म्हणून बॅरिकेड्स लावले आहेत. परंतू या बॅरिकेड्स काही ठिकाणी तोडून टाकण्यात आल्या असून जीवघेण्या शॉर्टकटचा वापर केला जात आहे. त्यामुळे भुयारी मार्गाची सुविधा असताना धोका पत्करून पामबीच मार्गाचा वापर करणे अत्यंत चुकीचे आहे. त्यामुळे नागरिकांनी याबाबत खबरदारी बाळगणे आवश्यक आहे. याच भुयारी मार्गाला श्री बामणदेव भुयारी मार्ग असे नाव देण्यात आले आहे.

## पावसाळ्यातील साथीच्या आजारांचा सामना करण्यासाठी आरोग्य विभाग सज्ज

■ मुंबई: प्रथमेश चव्हाण

पावसाळ्यात गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया या जिल्ह्यांमध्ये हिवताप, विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये जपानी मेंदूज्वर, चांडीपूरा मेंदूज्वर, तर कोकणपट्टीतील जिल्ह्यांमध्ये लेप्टोस्पायरोसीस, शहरी भागात



डेंग्यू अशा विविध आजाराच्या साथी पसरतात. या साथीच्या आजारांना आळा घालण्यासाठी आरोग्य विभागाने कंबर कसली आहे. साथरोग परिस्थितीच्या प्रभावी नियंत्रणासाठी आवश्यक पूर्वतयारी करण्याच्या सूचना आरोग्य विभागाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायती व रुग्णालयांना दिल्या आहेत. पावसाळ्यात राज्यात विविध साथींचे आजार पसरतात. त्यामुळे साथीच्या आजारांना प्रतिबंध करण्यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या गृह भेटींमध्ये वाढ करण्याबरोबरच पंधरवडा सर्वेक्षण दिनदर्शिका तयार करावी, जलजन्य, कीटकजन्य आजाराच्या रुग्णांचा शोध घेऊन नागरिकांना साथरोगाचा प्रसार, प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपाय, घ्यावयाची काळजी याची माहिती देण्याच्या सूचना आरोग्य कर्मचाऱ्यांना दिल्या आहेत. प्रत्येक जिल्ह्याने जोखिमग्रस्त गावांची यादी तयार करावी, जलजन्य आजाराच्या प्रतिबंधासाठी पाणी स्त्रोतांची प्रभावी गुणवत्ता सनियंत्रण करणे, प्रत्येक ग्रामपंचायत, नगर पालिका, महानगरपालिकेच्या ठिकाणी विरंजक चुर्णाचा साठा उपलब्ध करावा, अशा सूचनाही करण्यात आल्या आहेत. गावागावांत दर आठवड्याला सर्वेक्षण करून तेथील डासांची उत्पत्तीस्थाने नष्ट करावी, कीटकनाशक फवारणी करावी, त्याचप्रमाणे उपकेंद्र, जिल्हा रुग्णालये आदींमध्ये आवश्यक औषधे पुरेशा प्रमाणत उपलब्ध करावी. दुर्गम भागातील आरोग्य संस्थामध्ये किमान तीन महिने पुरेल एवढा औषधांचा पुरवठा करावा.तसेच साथरोग प्रभावीपणे सर्वेक्षण करण्यासाठी आशा सेविकांचा सहभाग घेणे, साथरोग नियंत्रणासाठी पाणीपुरवठा व स्वच्छता, ग्रामविकास, कृषी, नगरविकास आणि पशुसंवर्धन अशा विविध विभागांशी नियमित समन्वय ठेवण्याच्या सूचना आरोग्य विभागाने दिल्या आहेत.

## विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेचे काम रखडणार? भूसंपादन मोबदल्याच्या फाईल एमएसआरडीसीने परत मागवल्या

■ पनवेल: दिगंबर जाधव

विरार अलिबाग बहुउद्देशीय महामार्गासाठी भूसंपादन अद्याप पनवेल तालुक्यात झाले नसताना महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) कामांच्या निविदा प्रक्रीया पूर्ण केली. दरम्यान पनवेल तालुक्यातील विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेसाठी सुरू असणारी भूसंपादनाची प्रक्रीया ७ टक्यानंतर अचानक ठप्प झाली आहे. याबद्दल शेतकऱ्यांनी प्रांत कार्यालयात कारण विचारल्यावर त्यांना स्थानिक अधिकाऱ्यांकडून एमएसआरडीसीच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी भूसंपादनाच्या मोबदला वाटपाच्या फाईल मागवून घेतल्याचे सांगण्यात आले. १५ मे रोजी पनवेलच्या प्रांत कार्यालयातून सर्व भूसंपादनाच्या फाईल थेट एमएसआरडीसीच्या कार्यालयात पाठवण्यात आल्या. पंधरा दिवस उलटले तरी या फाईलींमध्ये किती गुंतवणूकदार आहेत आणि किती शेतकरी याचा शोध एमएसआरडीसीचे उच्चपदस्थ अधिकारी लावू शकले नाहीत. त्यामुळे विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेचे भूसंपादन वेळीत होणार, की अजून काही महिने भूसंपादन रखडेल अशी स्थिती निर्माण झाली आहे. मागील १० वर्षापासून विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेचे नियोजन सुरू आहे. मुख्यमंत्री पदाची सूत्रे एकनाथ शिंदे यांच्या हाती आल्यानंतर या प्रकल्पाच्या हालचालींना वेग आला.



शेतकऱ्यांना सुद्धा बाजारमुल्यापेक्षा पाच पटीने जमिनीचा मोबदला मिळणार असल्याने या प्रकल्पात जमीन गेल्यानंतर मोबदला मिळेल या आशेने शेतकरी या प्रकल्पाकडे लक्ष्य देऊन होते. दरम्यान वडोदरा मुंबई महामार्ग हा विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेला पनवेल तालुक्यातील मोरबे गावाजवळ जोडला जाणार असल्याने पनवेल हे भविष्यातील विकासाचे नवे केंद्रबिंदू बनणार आहे. पनवेलच्या पूर्व भागाचा कायापालट या महामार्गामुळे होणार आहे. नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्रातील (नैना) ४० गावे यामुळे थेट महामार्गाला जोडली जातील. दिल्लीहून थेट उरणच्या बंदरात विना वाहतूक कोंडीचा प्रवास कंटेनरची होऊ शकणार आहे. या महामार्गामुळे मुंब्रा पनवेल, कल्याण पनवेल या महामार्गाचा ताण ५० टक्के कमी होणार आहे. परंतू सुरुवातीपासून या रस्ते प्रकल्पाच्या कामातील अडचणी वाढतच आहेत. सुरुवातीला रायगड जिल्ह्यातील भूसंपादनाची दरनिश्चितीची प्रक्रीया रेंगाळल्याने मुख्यमंत्री शिंदे यांनी रायगड जिल्हाधिकाऱ्यांची उचलबांगडी केली. नवे जिल्हाधिकाऱ्यांनी काही दिवसात दरनिश्चित करुन हा प्रश्न मार्गी लावल्यानंतर काही दिवसात शेतकऱ्यांचे अंतिम निवाडे तयार झाले. दरम्यान लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू झाली.

## भविष्यात बेस्टची बस सेवा कोलमडण्याची शक्यता, मे महिन्यात ५५६ कर्मचारी निवृत्त

■ मुंबई: विशाल कारंडे

आर्थिक कोंडीत सापडलेल्या बेस्ट उपक्रमातील तब्बल ५५६ कर्मचारी मे महिन्यामध्ये सेवा निवृत्त झाले असून बेस्ट उपक्रमाच्या परिवहन विभागातील सुमारे ५० टक्के कर्मचाऱ्यांचा त्यात समावेश आहे. परिणामी, भविष्यात बेस्टची बस सेवा कोलमडण्याची शक्यता आहे. सध्या परिवहन विभागातील १६ हजार कर्मचारी असून यात वाहक, चालकाचा समावेश आहे. मात्र, जुलै महिन्यापर्यंत शेकडो कर्मचारी सेवा निवृत्त होत असून बेस्टच्या बसचे चाक कर्मचाऱ्यांअभावी थांबण्याची शक्यता आहे.



मुंबई महानगरात धावणाऱ्या बेस्टचा प्रवास स्वस्तात, वेगात आणि गारेगार होत आहे. सध्या बेस्ट बसमधून ३२ ते ३५ लाख प्रवासी प्रवास करीत आहेत. परंतु, बेस्टच्या स्वमालकीच्या बस झपाट्याने कमी होत असल्याने बसची संख्या कमी होत आहे. बेस्ट उपक्रमाने स्वमालकीच्या ३,३३७ बसगाड्यांचा ताफा राखण्यासाठी मुंबई महापालिकेने तातडीने निधी देणे आवश्यक आहे. स्वमालकीच्या बस ताफ्यात दाखल केल्या नाहीत, तर, मार्च २०२७ पर्यंत बेस्टकडे स्वमालकीच्या बसगाड्याच उरणार नाहीत. तर, येत्या काळात बेस्टच्या परिवहन विभागातून निवृत्ती होणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या अधिक आहे. येत्या काळात कर्मचाऱ्यांची भरती न केल्यास बेस्टच्या बस चालवण्यास चालक व वाहकांची कमतरता भासेल. याचा थेट फटका प्रवासी वर्गाला बसेल. प्रवाशांना अवेळी बस फेऱ्या, बसची वारंवारता कमी असणे अशा समस्यांना सामोरे जावे लागेल. बेस्टच्या परिवहन विभागात एकूण १६ हजार ५७७ कर्मचारी होते. मात्र, मे महिन्यात बेस्टच्या संपूर्ण विभागातील ५५६ कर्मचारी निवृत्त झाले.

## मे मध्ये मुंबईतील १२००० घरांची विक्री

■ मुंबई: राकेश गायकवाड

मे महिन्यात मुंबईतील १२ हजार घरांची विक्री झाली असून राज्य सरकारला या घरांच्या विक्रीतून मुद्रांक शुल्कापोटी १ हजार ०३४ कोटी रुपये महसूल मिळाला. यंदा मुंबईतील घरविक्री स्थिर असून ११ हजार ते १४ हजारच्या दरम्यान राहिली आहे. जानेवारीत १० हजार ९९७, तर फेब्रुवारीत १२ हजार ५५ घरांची विक्री झाली होती. मार्चमध्ये मात्र त्यात वाढ झाली असून या महिन्यात तब्बल १४ हजार घरांची विक्री झाली. तर एप्रिलमध्ये ११ हजार ६४८ घरांची विक्री झाली. आता मेमध्ये घरविक्रीत किंचितशी वाढ झाली आहे. मेमध्ये घरविक्रीने १२ हजारांचा टप्पा गाठला आहे. तर या घरविक्रीतून मुद्रांक शुल्कापोटी १०३४ कोटी रुपये महसूल मिळाला आहे. मे महिन्यातील ही घरविक्री समाधानकारक मानली जात आहे. मागील वर्षी मे महिन्यात नऊ हजार ८२३ घरांची



विक्री झाली होती. २०२२ मध्ये नऊ हजार ८३९ घरांची विक्री झाली असून २०२१ मध्ये पाच हजार ३६० घरे विकली गेली होती. करोनाकाळात मे २०२० मध्ये केवळ २०७ घरांची विक्री झाली होती. दरम्यान मे २०२४ मधील घरविक्री ही आतापर्यंतची मे महिन्यातील सार्वधिक घरविक्री आहे. त्यामुळे ही घरविक्री समाधानकारक मानली जात आहे.

## सागरी किनारा प्रकल्पातील बोगद्यांमधील गळती रोखण्याचे काम सुरूच

■ मुंबई: माधव अलवा

महानगरपालिकेने मुंबई किनारी रस्ता प्रकल्पातील गळती लागलेल्या भूमिगत बोगद्याची दुरुस्ती हाती घेतली असून दुरुस्तीचे काम लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे. आतापर्यंत दोन सांध्यांमधून झिरपणारे पाणी रोखण्यात आले आहे. तसेच, तीन सांध्यांच्या ठिकाणी असणारा ओलावाही आटोक्यात आला आहे. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी शुक्रवारी घटनास्थळी पाहणी करून दुरुस्तीकामांचा आढावा घेतला. महानगरपालिकेच्या महत्त्वाकांक्षी सागरी किनारा रस्ता प्रकल्पातील भूमिगत बोगद्यामध्ये नुकतीच गळती लागल्याची घटना घडली होती. हजारो कोटी रुपये खर्च करून साकारण्यात आलेल्या प्रकल्पातील या घटनेमुळे पालिकेवर टीका झाली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घटनास्थळी पाहणी करून तात्काळ दुरुस्तीचे आदेश पालिका अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार, पालिकेने गळती रोखण्याचे काम हाती घेतले. गळती रोखण्यासाठी पॉलिमर ग्राऊटिंगच्या इंजेक्शनच्या वापर करण्यात आला असून गळती रोखण्यात पालिकेला यश आले आहे. पालिका आयुक्तांनी शुक्रवारी या दुरुस्ती कामांची पाहणी केली. भूमिगत बोगद्यात केलेल्या उपाययोजनांची माहिती अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. अमित सैनी यांनी दिली. यावेळी सह आयुक्त चंद्रशेखर चोरे, उप आयुक्त चक्रधर कांडळकर आदी उपस्थित होते.

